मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १५३ ■ मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# पनवेलमध्ये भाजपयुती आणि 'एकच वादा प्रशांतदादा'चा जयघोष

## जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीमध्ये भाजपचा ऐतिहासिक विजय

## पनवेल पंचायत समितीमध्ये भाजप युतीचा दणदणीत विजय; पनवेलमध्ये शेकापचा गड उध्वस्त

### 'सुपडा साफ किया रे' - माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांची जल्लोषात प्रतिकिया







**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यात जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप महायुतीने शेतकरी कामगार पक्ष महाविकास आघाडीचा दारुण पराभव करत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. पनवेल तालुक्यातील ८ पैकी ८ जिल्हा परिषदेच्या जागा तर पनवेल पंचायत समितीच्या १६ पैकी १५ जागांवर विजय मिळवला. दीर्घकाळ शेकापच्या ताब्यात असलेला हा राजकीय गड भाजप महायुतीने उध्वस्त करत शेकापचा सुपडासाफ करून पनवेल पंचायत समितीवर एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. या विजयामुळे पनवेल तालुक्यात शेकापची जुलमी व दडपशाहीची सत्ता उलथवून लावण्यात भाजप महायुतीला मोठे यश मिळाले असून, जनतेने विकास, पारदर्शकता व सक्षम नेतृत्वावर आपला ठाम विश्वास व्यक्त केला. निवडणूक निकालानंतर संपूर्ण पनवेल तालुक्यात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले, 'भाजपमहायुतीचा विजय असो', 'एकच वादा प्रशांतदादा' अशा जोरदार घोषणा देत कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

हा दैदिप्यमान विजय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली मिळवला. भाजप महायुतीच्या नेतृत्वाने पनवेल तालुक्यातील विकास, पायाभूत सुविधा, शेतकरी, युवक व महिला सक्षमीकरण या मुद्द्यांवर विश्वासार्ह भूमिका मांडली. याच भूमिकेला मतदारांनी भरभरून प्रतिसाद देत भाजप महायुतीला स्पष्ट कौल दिला आहे.या विजयामुळे आगामी काळात पनवेल तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार असून, जनतेच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी भाजप महायुती कटिबद्ध राहील, असा विश्वास यावेळी नेतृत्वाने व्यक्त केला.

गव्हाण जिल्हा परिषद गटातून निकिता निलेश खारकर, वावंजे जिल्हा परिषद गटातून कमला एकनाथ देशेकर, नेरे जिल्हा परिषद गटातून आत्माराम बाळू भस्मा, पालीदेवद जिल्हा परिषद गटातून प्राची अमित जाधव, पळस्पे जिल्हा परिषद गटातून हर्षदा अतुल घरत, वावेघर जिल्हा परिषद गटातून अनन्या अविनाश गाताडे, वडघर जिल्हा परिषद गटातून सोनाली अनुज जितेकर, केळवणे जिल्हा परिषद गटातून मंगेश रामचंद्र वाकडीकर यांनी, गव्हाण पंचायत समिती गणातून जिज्ञासा किशोर कोळी, वहाळ पंचायत समिती मधून वितेश त्रिंबक म्हात्रे, वावंजे पंचायत समिती गणातून आरती कुणाल काठे, चिंध्रण गणातून अंकुश बाळाराम खैर, नेरे पंचायत गणातून वर्षा सचिन केवारे, आदई गणातील भूपेंद्र सदानंद पाटील, पालीदेवद पंचायत समिती गणातून वैशाली प्रविण सावंत, विचुंबे पंचायत समिती गणातून नीलम प्रमोद भिंगारकर, पळस्पे पंचायत समिती गणातून राजेंद्र हरिचंद्र पाटील, कोन पंचायत समिती गणातून योगिता योगेश लहाने, वावेघर पंचायत समितीमधून राजु गणा पाटील, पोयंजे पंचायत समितीमधून अस्मिता अनंता पाटील, करंजाडे पंचायत समितीमधून रंजना सदाशिव वास्कर, वडघर पंचायत समिती गणातील मनिषा गजानन पाटील, आणि आपटा पंचायत समितीमधून मयुर परशुराम शेलार यांनी दणदणीत विजय मिळवला. या सर्व विजयी उमेदवारांचे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी. कार्यकर्ते व ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी पनवेलमध्ये ढोलताशा, फटाक्यांची आतषबाजी आणि जयघोषणेने विजयी जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी जल्लोषाच्यावेळी 'सुपडा साफ किया रे' अशी जोरदार प्रतिक्रिया दिली.

या निवडणुकीत शेकाप महाविकास आघाडीने लोकशाही मूल्यांना तिलांजली देत विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्याऐवजी खोटे आरोप, अफवा आणि अपप्रचाराची राळ उडवण्याचे काम केले. समाजात संभ्रम निर्माण करून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. याउलट भाजप महायुतीने लोकशाही मार्गाचा अवलंब करत राज्यातील आणि देशातील विकासकामांचा ठोस लेखाजोखा जनतेसमोर मांडला. पायाभूत सुविधा, रोजगारनिर्मिती, शेतकरी, महिला, युवक, उद्योग, शिक्षण व आरोग्य या सर्व क्षेत्रांतील विकासकामे आणि भविष्यातील स्पष्ट दृष्टीकोन घेऊन महायुतीने निवडणूक लढवली. विरोधकांच्या नकारात्मक राजकारणाला मतदारांनी स्पष्टपणे नकार दिला असून, विकास, स्थैर्य आणि सक्षम नेतृत्वावर विश्वास दाखवला आहे. हा निकाल म्हणजे लोकशाही मार्गाने, सकारात्मक विचारांनी आणि विकासाच्या अजेंड्यावर लढवलेल्या राजकारणाचा विजय झाला आहे. शेकापची पनवेल पंचायत समितीवर अनेक वर्षे सत्ता राहिली मात्र पंचायत समितीच्या माध्यमातून विकास दूरच राहिला त्यामुळे शेकापच्या मनमानी कारभाराला जनता पुरती कंटाळली होती.

नुकताच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिकेतही शेकाप महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला होता त्यातच आजच्या निकालाने शेकापची पूर्ण दैना झाली आहे. त्यामुळे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या कार्यपद्धतीवर पनवेलची जनता कंटाळली असल्याने हा निकाल त्याचे बोलके चित्र असल्याची चर्चा पनवेलवेलमध्ये रंगली आहे.

# शेकापच्या पारंपारिक जागा भाजपाकडे

## "प्रितम म्हात्रे यांच्या भाजपाप्रवेशामुळे रायगड जिल्ह्यात राजकीय समीकरणात मोठा बदल"

■ रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समिती निवडणूक २०२६ – संक्षिप्त आढावा
■ पनवेल पंचायत समिती प्रथमच भाजपाच्या ताब्यात
■ रायगड जिल्हा परिषदेच्या ८ पैकी ८ जागा भाजपच्या ताब्यात
■ पनवेल पंचायत समितीच्या १६ पैकी १५ जागांवर भाजपाचे निर्विवाद वर्चस्व

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यात भाजपाने जिंकलेल्या एकूण १५ जागांपैकी ८ जागा पनवेलमधून पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली देशभरात तसेच महाराष्ट्रात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख दूरदृष्टीतून राज्यात वेगाने विकासकामे सुरू आहेत. याच विकासाच्या धर्तीवर रायगड जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री. रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्ष सातत्याने प्रभावी कार्य करत आहे. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते मा. श्री. जे. एम. म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी सन २०२५ मध्ये अनेक नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सरपंच यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांसोबत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या प्रवेशानंतर रायगड व नवी मुंबई परिसरात भाजपाच्या संघटनात्मक बळाला मोठी चालना मिळाली असून पक्ष संघटना अधिक मजबूत झाली आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या पनवेल महानगरपालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने एकहाती विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. या विजयाची सुरुवात प्रितम म्हात्रे यांच्या प्रभाव असलेल्या प्रभागातून झाली, जिथे दोन नगरसेवक बिनविरोध निवडून आले. त्यानंतर पनवेल शहर परिसरातून आणखी चार नगरसेवक बिनविरोध निवडून येत एकूण सहा नगरसेवक बिनविरोध निवडून आले. विशेष म्हणजे शेतकरी कामगार पक्षातून भाजपात प्रवेश केलेल्या उमेदवारांना भाजपातर्फे संधी देऊन पुन्हा निवडून आणण्यात आले, ज्यामुळे भाजपाचा विजय अधिक ठोस ठरला.

> **"आदरणीय जे. एम. म्हात्रे साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर पक्षाच्या विचारधारेनुसार रोजगार आणि विकासाच्या दृष्टिकोनातून कामे सुरू केली. ही कामे प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहोचवण्यात आम्हाला यश आले. त्यामुळेच शेकापच्या पारंपारिक मतदारसंघातील मतदारांनी भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेला मान्यता देत विकासाच्या बाजूने कौल दिला. याबद्दल मी सर्व मतदारांचे मनापासून आभार मानतो."**
>
> **— श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे**
> **भाजपा नेते**
> **मा. विरोधी पक्षनेते, पनवेल महानगरपालिका**

**शेकापला रायगड जिल्हा परिषदेत खातेही उघडता आले नाही**

शेतकरी कामगार पक्षाचा पारंपारिक गड मानल्या जाणाऱ्या गव्हाण, वडघर, केळवणे, वावंजे , वावेघर, पळस्पे आदी जिल्हा परिषद मतदारसंघांमध्येही भाजपाने आपली पकड भक्कम केली आहे. जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान गावोगावी भेटी देत भारतीय जनता पक्षाची विचारधारा, केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती तसेच तरुणांसाठी रोजगार निर्मितीचे नियोजन प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहोचवण्यात आले. परिणामी पारंपारिक शेकाप मतदारांमध्ये सकारात्मक मतपरिवर्तन होऊन भाजपाच्या उमेदवारांना जनतेचा स्पष्ट कौल मिळाला.

या संपूर्ण प्रक्रियेत भाजपाचे लोकनेते मा. खासदार श्री. रामशेठ ठाकूर तसेच मा. नगराध्यक्ष श्री. जे. एम. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार श्री. प्रशांत ठाकूर यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. महायुतीतील सर्व घटक पक्षांचा समन्वय साधत आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्री. प्रितम म्हात्रे यांच्यासोबत थेट मतदारांपर्यंत पोहोचून प्रभावी मोर्चेबांधणी केली. या एकत्रित प्रयत्नांमुळे भाजपाने हा विजय एकहाती मिळवला, हे विशेषत्वाने अधोरेखित करावे लागेल.

# घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना खांदेश्वर पोलिसांनी केले अवघ्या 36 तासात जेरबंद

## गुन्ह्यातील जवळपास पावणे दहा लाखाचे दागिने केले हस्तगत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर** : घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना खांदेश्वर पोलिसांनी अवघ्या 36 तासात जेरबंद करून त्यांच्याकडून गुन्ह्यातील जवळपास पावणे दहा लाख रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात होत असलेल्या दिवसा घरफोडीच्या गुन्हयाना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त मिलींद भारंबे व पोलीस सह आयुक्त संजय येनपुरे, अप्पर पोलीस आयुक्त (गन्हे) दिपक साकोरे तसेच पोलीस उपायुक्त परि 03, पनवेल प्रशांत मोहिते, सहा पोलीस आयुक्त सो, भाउसाहेब ढोले यांनी वेळोवेळी केलेल्या सुचना नुसार खांदेश्वर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. 1 30/2026 भारतिय न्याय संहिता 2023 चे कलम 305(अ), 331(3), 331 (4) या गुन्हयाच्या घटनास्थळी तात्काळ भेट देवून वपोनि स्मिता ढाकणे, मा. पोनि (गुन्हे) सचिन परदेशी यांच्या सुचने नुसार घटनास्थळा वरील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून तसेच आरोपी येण्याजाण्याच्या मार्गाचा अभ्यास करून मार्गीके वरील फुटेज तपासले तसेच पोलीस खात्यातील उपलब्ध तांत्रिक साधनांच्या मदतीने व गोपनिय बातमीदारांच्या प्राप्त माहीती

घेत असताना खांदेश्वर पोलीस ठाणेचे सपोनि उत्तम घेगडमल, राजरत्न खैरनार, पोहवा




महेश कांबळे, वाघमारे, रणजित पाटील, वैभव शिंदे, धिरेंद्र पाटील, पोशि सचिन पवार, विकास कामनुरकर, स्वप्निल कोळी, युवराज शिवगुंडे, ऋषिकांत परदेशी आदींच्या पथकाला या गुन्ह्यातील आरोपी रफिक माझीद शेख, (35 रा.जोगेश्वरी मुंबई), मोहम्मद बिलायत अब्दुल रहिम खान (30 रा.नालासोपारा), शकिल रुबील शेख (30 रा.बांद्रा, मुंबई) या ठिकाणी स्वतःचे अस्तित्व लपवून राहत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. सदरबाबत पथकासह शिताफिने ताब्यात घेवून सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. नमूद आरोपीताकडे केलेल्या तपासात त्यांच्याकडून गुन्हयातील घरफोडी करून चोरलेले 95 ग्रॅम सोन्याचे व 52 ग्रॅम चांदीचे दागीने असे एकूण 9,56,150/- रू कि व गुन्हा करण्यासाठी वापरलेले हत्यारे हस्तगत करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि उत्तम घेगडमल करीत आहेत.

# जावयानेच केली सासूला मारहाण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)** : जावयाने सासूला मारहाण केल्या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.45 वर्षीय महिला या टेंभोडे येथे राहत असून त्या नवीन पनवेल येथील गार्डनमध्ये साफसफाई करत होत्या. यावेळी त्यांचा जावई आला आणि त्याने तुमच्या मुलीला मस्ती आली आहे असे बोलून लोखंडी सळईने त्यांना मारहाण केली आणि तो पळून गेला. त्यांच्यावर प्राचीन हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

# सर्व लोकल एसी होण्यास सहा वर्षे लागणार; एमआरव्हीसीकडून निविदा प्रक्रिया सुरु

**मुंबई** : मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (एमयूटीपी) टप्पा तिसरा आणि तिसरा-अ अंतर्गत मुंबईला २३८ 'वंदे मेट्रो' वातानुकूलित लोकल गाड्या मिळणार आहेत. मुंबई रेल्वे विकास महामंडळानुसार (एमआरव्हीसी), कंत्राट मंजूर झाल्यानंतर अडीच वर्षांत पहिल्या प्रोटोटाइप गाड्या




मिळण्याची अपेक्षा आहे. या गाड्यांची चाचणी यशस्वी झाल्यानंतर चार ते सहा वर्षांच्या कालावधीत सर्व गाड्यांचा पुरवठा केला जाणार आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) २,८५६ वंदे मेट्रो डब्यांच्या खरेदी व देखभालीसाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे.

# अल्पवयीन मुलीला फुस लावून नेले पळवून

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावून पळवून नेल्याची घटना पनवेल शहरामध्ये घडली आहे. अलिशा तौसिफ तबीब असे या अल्पवयीन मुलीचे नाव असून तिचे वय १५ वर्षे, उंची ५ फुट अंदाजे, रंग सावळा, चेहरा उभट, बांधा मध्यम, केस काळे लांब, नाक सरळ, अंगात निळया रंगाचा पंजाबी ड्रेस, काळी पॅन्ट तसेच बुरखा परिधान केलेला आहे. सदर मुलींबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण (मो. ९८२३१९३८८८) यांच्याशी संपर्क साधावा.

# तळा तालुक्यातील मतदान शांततेत पार; तालुक्यात 50.10 % मतदान

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी/नितीन लोखंडे :** तळा तालुक्यामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 निर्वाचक गणामध्ये 7 फेब्रुवारी रोजी निवडणूक शांततेत पार पडली. मतदान केंद्र क्रमांक 44 / 14 प्राथमिक शाळा कुडे येथील मतदान केंद्रावर सकाळी ७.३० वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. स्थानिक मतदारांनी सकाळीच हजेरी लावत आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मतदान केले. मुंबईमधून आलेल्या मतदारांनी दुपारनंतर मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. बुथप्रमाणे तपशील पुढीलप्रमाणे 88 मांदाड बुथ नंबर 44/12 /1 मांदाड एकूण



मतदार 589 पैकी 357 मतदान, 44/ 13/ 2 मांदाड एकूण मतदार 751 पैकी 325 मतदान, 44/ 14 कुडे एकून मतदार 770 पैकी 350 मतदान, 44/ 15 रोवळे एकुण मतदार 792 पैकी 366 मतदान, 44 /16 वाशीहवेली एकूण 847 मतदार पैकी 622 मतदान, 44 /17 कुंबळे एकूण मतदार 397 पैकी 246, मतदान, 44/18 मालुक एकूण मतदार 902 पैकी 394 मतदान, 44/ 19 वरळ एकूण मतदार 549 पैकी 324 मतदान, 44/20 मजगांव एकूण 737 मतदार पैकी 409 मतदान, 44/21 गणेशनगर एकूण 337 मतदार पैकी 276 मतदान 44/22 ताम्हाणे त.तळे एकूण 672 मतदार पैकी 309 मतदान 44/23 पन्हेळी एकूण 797 मतदार पैकी 283 मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडल्यानंतर संध्याकाळी ५.३० नंतर उमेदवारांचे भवितव्य निवडणूक अधिकारी कर्मचारी तसेच प्रतिनिधीच्या समोर मतपेटीत बंद करण्यात आले. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा आणि पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आता मतदारांना 9 फेब्रुवारी च्या निकालाची प्रतिक्षा लागली आहे.

# दहावी-बारावीला ४२ हजार विद्यार्थी

## प्रशासन सज्ज; दहावीचे २० हजार तर बारावीचे २२ हजार परीक्षार्थी

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या यंदाच्या दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. मंडळाच्या निर्देशानुसार बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान घेण्यात येणार आहे.

यंदा वाशिम जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेसाठी २० हजार ५६, तर बारावीच्या परीक्षेसाठी २२ हजार ३६९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले असून, एकूण ४२ हजार ४२५ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

परीक्षा कॉपीमुक्त पार पाडण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून परीक्षेदरम्यान सतत देखरेख ठेवली जाणार असून, यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने व्यापक तयारी केली आहे.

दहावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यात ८८ परीक्षा केंद्रांवरील ८३५ वर्गखोल्यांमध्ये, तर बारावीच्या परीक्षेसाठी ७४ परीक्षा केंद्रांवरील ८३० वर्गखोल्यांमध्ये मंडळाच्या निर्देशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही सुरू आहे.

### उपद्रवी केंद्रांवर विशेष लक्ष

दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी शिक्षण मंडळाने विशेष उपाययोजना आखल्या आहेत. त्याअंतर्गत उपद्रवी परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे.

वाशिम जिल्ह्यात दहावीची १९ व बारावीची २८ अशी एकूण ४७ उपद्रवी परीक्षा केंद्रे असून, या ठिकाणी कोणतेही गैरप्रकार घडू नयेत यासाठी अतिरिक्त दक्षता व कडक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.तसेच सर्व परीक्षा केंद्रांवर विद्युत जोडणी, पंखे, दिवे तसेच इतर आवश्यक भौतिक सुविधांची पाहणी करण्यात आली आहे. परीक्षा कालावधीत अखंडित वीजपुरवठा राहावा यासाठी जनरेटर किंवा इन्व्हर्टरची पर्यायी व्यवस्था ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निर्देशानुसार यंदाच्या दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगल धुपे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येत असून, त्यासोबतच आवश्यक सोयीसुविधांचीही पाहणी करण्यात येत आहे, अशी माहिती उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) आकाश आहाळे यांनी दिली.एकूणच यंदाच्या दहावी व बारावीच्या परीक्षा पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने पूर्ण तयारी केली असल्याचे दिसून येत आहे.

# उरणच्या भेंडखळ बीपीसीएल मार्गावर अनधिकृत पार्किंग; प्रशासनाची अळीमिळी गुपचिळी

**दैनिक युवक आधार**

**उरण–प्रतिनिधी/सायली साळुंके :** उरण तालुक्यातील भेंडखळ बीपीसीएल मार्गावर अनधिकृत वाहन पार्किंग मोठ्या प्रमाणावर सुरू असून याकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. प्रत्यक्षात अनधिकृत पार्किंगचे वास्तव सर्वश्रुत असतानाही या बेकायदेशीर प्रकारावर कारवाई करण्याबाबत प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचे चित्र दिसून येत आहे.



या मार्गावर सातत्याने होणाऱ्या अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. जड वाहने रस्त्याच्या दुतर्फा उभी राहिल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी अशा प्रकारच्या पार्किंगविरोधात कारवाई झाली नसल्याने वाहनचालक बेधडकपणे रस्त्यावरच वाहने उभी करताना दिसत आहेत.

सिडकोकडून पार्किंग नियोजनासाठी पाच प्लॉट राखीव ठेवण्यात आले असले तरी ते अद्याप विकसित करण्यात आलेले नाहीत. परिणामी, मुख्य मार्गांवरच सर्व्हिस रोडचा गैरवापर करून अवैध पार्किंग सुरू आहे. मात्र उरण वाहतूक शाखेमार्फत अशा वाहनांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या बेकायदेशीर पार्किंगमुळे वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत असून सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे सर्व्हिस रोडवर व मुख्य मार्गांवर अनधिकृत पार्किंग करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# जैन आयडियल कॉन्व्हेंट यांची कुतूहल विज्ञान प्रदर्शनी वाशीम येथे भेट

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** अनसिंग जैन आयडियल कॉन्व्हेंट चे विद्यार्थी वाशिम येथे भरलेल्या कुतुहल विज्ञान प्रदर्शनी येथे दिनांक सात फेब्रुवारी 2026 वार शनिवारला भेट देण्यासाठी गेले होते त्यामध्ये विज्ञान विद्यार्थ्यांना मानवी शरीरातील आतील अवयव त्यामध्ये मेंदू, हृदय, फुफ्फुस, आतडे, हाडे असे इत्यादी अवयव त्यांना पाहायला मिळाले. त्यांची सर्व माहिती तेथील उपस्थित मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी यांनी विद्यार्थ्यांना दिली तसेच विद्यार्थ्यांनी त्यांना प्रश्न सुद्धा विचारले आणि त्यांची उत्तरे त्यांना मिळाली त्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद आणि जिद्दनाशा अजून वाढत




गेली. दिलेली व पहालेली सर्व माहिती विद्यार्थ्यांनी आपल्या वहीत नमूद केली . तसेच विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा सत्र न्यायालय, जिल्हा परिषद इमारत यांना सुद्धा भेटी दिल्या. यामध्ये सर्व वर्गाचे विद्यार्थी व जैन आयडियल चे शिक्षक उमेश सुरूशे सर, अमोल राठोड सर सुनील आडे सर, सौ. दिपाली निंबेकर मॅडम, कु. नंदिनी मोहरे मॅडम यांनी सुद्धा परिश्रम घेतले.

# चिमुकल्यांनी नृत्याच्या माध्यमातून सांगितले मोबाईलचे दुष्परिणाम

## (स्व.मोहनलालजी कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलनाचे आयोजन)

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरो शे महागाव:- (यवतमाळ) :** स्व.मोहनलालजी पुरोहित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात घे भरारी स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये रामलालजी पुरोहित इंग्लिश मिडीयम स्कूल मधील केजी २मधील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मानवी जीवनात मोबाईल जितका चांगला तेवढ्या मोठ्याप्रमाणात त्याचे होणारे दुष्परिणाम आपल्या नृत्याविष्कारातून दाखवित उपस्थितांची मने जिंकुन घेतली.

महागाव येथील स्व. मोहनलालजी पुरोहित यांना कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात घे भरारी वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.



या स्नेह संमेलनाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय मस्के (तहसीलदार महागाव)प्रमुख अतिथी ठाणेदार धनराज निळे,नगराध्यक्षा सौ.सुनंदा दिलीपराव कोपरकर यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रितेश पुरोहित ,उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे,बाजार समितीचे सभापती रविंद्र पवार, बाजार समितीचे संचालक किशोर देशमुख,विनोद पाटील राऊत,नगरसेवक शैलेश कोपरकर,सुजित ठाकुर,भाजप शहराध्यक्ष निलेश नरवाडे,माजी उपनगराध्यक्ष सुरेश पाटील नरवाडे,देवानंद पाटील दुपात्रे,शिवसेना उबाठा विधानसभा प्रमुख भिमराव भालेराव, महागाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर,पत्रकार विशाल डहाळे ,शेरखान पठाण,गोपी चक्करवार,संजय अमिलकंठवार यांच्यासह पालक उपस्थित होते.

आधुनिक तंत्रज्ञानाने प्रगती साध्य केली असुन सद्या मोबाईलचे युग असल्याने आज जग फार जवळ आले. अनेक कामे मोबाईलमुळे सुसह्य झालीत त्याच बरोबर मोबाईल मानवी जीवनाचा अविभाज्य घटका बनला खरा परंतु याच बरोबर या मोबाईलचे दुष्परिणाम सुद्धा मानवी जीवनात प्रकर्षाने जाणवु लागल्याने यावर वास्तव मांडणाऱ्या गीतावर रामलाल पुरोहित इंग्लिश मिडीयम स्कूलमधील मधील रियांशु धवसे,मोहन दलसिंगारे,सार्थक नरवाडे,अथर्व मिरासे, जैनाब पठाण,शर्वरी भंडारे, आराध्या पायघन, सान्वी राठोड या चिमुकल्यांनी बहारदार नृत्य सादर करीत उपस्थितांची मने जिंकुन घेतली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. जी. एस.स्वामी, प्रा.अनुप पवार,प्रा. वर्षा देशपांडे,प्रा. ए. टी. मुनेश्वर मॅडम, प्रयोगशाळ सहाय्यक अमितकुमार चव्हाण,शीतल जाधव, अजेश पवार,इंग्लिश मिडीयम स्कूलच्या व्यवस्थापिका मालती भारती मॅडम,प्राचार्य विद्या ठाकरे,शिक्षिका रेश्मा राणे,वर्षा बर्डे,सृष्टी नरवाडे,प्रणिता दलशिंगारे, शंकर दलशिंगारे, बाळु ससाणे,गायकवाड यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य दिपक संगेवार यांनी केले तर आभार प्रा.गोरे सर यांनी मानले.

# ग्रामदैवत श्री खंडेश्वर मंदिर महाशिवरात्र सप्ताहस प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी गोविंद थोरात :** परतूर तालुक्यातील आष्टी गावात मागील 65 वर्षा पासून ग्रामदैवत श्री खंडेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या ही वर्षी 9 फेब्रुवारी 2026 ते 16/02/2026 असा अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा सोहळा संपन्न होणार आहे. कथा वाचक वेदशास्त्र संपन्न नंदकिशोर महाराज गोंदिकर यांच्या अमृत वाणीतून कथा वाचन दररोज काकडा भजन, विष्णू सहस्त्नाम ,गाथा भजन , भागवत महापूराण,हरिपाठ, तसेच 9 ते 11 नामवंत कीर्तनकार चे कीर्तन असा मोठ्या प्रमाणात कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी कीर्तन व महाप्रसाद लाभ घ्यावा असे आव्हान श्री खंडेश्वर मंदिर संस्थान व समस्त गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात येत आहे.




# चित्तेगावच्या चिमुकली अन्वीच्या जीवासाठी मदतीचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**ऋषिकेश सुरशे (छत्रपती संभाजीनगर):**चित्तेगांव ता.पैठण येथील सहा वर्षांची चिमुकली अन्वी सुधीर रेवणवार हिला गंभीर आजाराने ग्रासले असून तिच्या जीव वाचवण्यासाठी लिव्हर ट्रान्सप्लांट करणे अत्यावश्यक झाले आहे. सध्या अन्वीला रुबी हॉस्पिटल, पुणे येथे दाखल करण्यात आले असून डॉक्टरांनी तातडीने ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला आहे.

या लिव्हर ट्रान्सप्लांटसाठी सुमारे २० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. मात्र अन्वीचे वडील सुधीर सुरेश रेवणवार हे सर्वसामान्य कुटुंबातील असून एवढी मोठी रक्कम उभारणे त्यांच्यासाठी अत्यंत कठीण झाले आहे. घरातील एकमेव कमावता व्यक्ती असलेल्या वडिलांवर अचानक आलेल्या या संकटामुळे संपूर्ण कुटुंब हतबल झाले आहे. अन्वीचे बालपण अजून सुरूही झालेले नाही. निरागस हसरा चेहरा


Sudhir Rewanwar

UPI ID: rewanwar87-4@okicici

70580 60778

Scan to pay with any UPI app

आणि आयुष्याच्या स्वप्नांसह ती आज मृत्यूशी झुंज देत आहे. योग्य वेळी उपचार मिळाल्यास अन्वीचे प्राण वाचू शकतात,मात्र त्यासाठी समाजाच्या मदतीची नितांत गरज आहे. तरी चित्तेगाव व परिसरातील



व्यापारी वर्ग, उद्योजक, प्रतिष्ठित नागरिक,युवा नेते, ग्रामपंचायत सदस्य,सरपंच तसेच दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन अन्वीच्या उपचारासाठी आर्थिक मदत करावी,असे कळकळीचे आवाहन कुटुंबीय व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

***रुग्णाची माहिती***

***नाव : अन्वी सुधीर रेवणबार***

***वय : ६ वर्षे***

***वडिलांचे नाव : सुधीर सुरेश रेवणबार***

***संपर्क क्रमांक : 07058060778***

***पत्ता :- मौजे रा. चितेगाव, लक्ष्मणभाऊ नगर,ता. पैठण,जि.छत्रपती संभाजीनगर***

***आजार / उपचार: लिव्हर ट्रान्सप्लांट दाखल रुग्णालय : रुबी हॉस्पिटल, पुणे***

# शिव वंदना – जागर शिव कर्तृत्वाचा : होरायझन ॲकाडमी निफाड येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित होरायझन ॲकाडमी, निफाड येथे शनिवारी (दि. ७ फेब्रुवारी) “शिव वंदना – जागर शिव कर्तृत्वाचा” या संकल्पनेवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळाले, तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्य, स्वराज्यनिष्ठा, शिस्त व राष्ट्रभक्तीचे संस्कार प्रभावीपणे रुजविण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे सभापती बाळासाहेब अप्पा क्षीरसागर, उपाध्यक्ष देवराम बाबुराव मोगल, शिक्षणाधिकारी डॉ. कैलास शिंदे, शालेय समिती अध्यक्षा मंजिरीताई कुंदे, भारतीताई कापसे, उषाताई कडलग, स्वाती गाजरे, देवदत्त कापसे, संदीप कापसे, ॲड. श्रीकांत रायते, अजय गोळे, ॲड. समीर भोसले व शालेय मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे




पूजन करून करण्यात आली.

यानंतर शिवस्तुतीपर गीत, नाट्यप्रयोग, समूहगीत, नृत्याविष्कार व प्रभावी निवेदनांच्या माध्यमातून शिवकालीन इतिहास सजीवपणे उलगडण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून महाराजांचे नेतृत्वगुण, लोककल्याणकारी विचार व स्वराज्याची प्रेरणा प्रकर्षाने दिसून आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शालेय मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष देवराम बाबुराव मोगल यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मनःपूर्वक कौतुक करत, “आजच्या विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त व देशभक्तीची भावना रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे,” असे मत व्यक्त केले.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती,दक्षिण नागपूर शाखा कार्यकारणी पुनर्गठित



**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक /नागपूर विभाग** : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती,दक्षिण नागपूर शाखा कार्यकारणी पुनर्गठित नुकतीच करण्यात आली.

नवी कार्यकारणी खालील प्रमाणे निवडण्यात आली.

१) अध्यक्ष- सविता मेंढे,
२)कार्याध्यक्ष -मंगला गाणार
३)उपाध्यक्ष वसंता मोहिले
४)सचिव -सुषमा शेवडे
५)सहसचिव -प्रीती नगरारे
६)बुवाबाजी संघर्ष विभाग- इंदूताई उमरे
७)वार्तापत्र आणि प्रकाशन विभाग- ज्योत्स्ना करवाडे
८) वैज्ञानिक जाणीव प्रकल्प विभाग-प्रीती नगरारे
९)मानसिक आरोग्य विभाग - करुणा मून
१०)महिला सहभाग -माही मोहिले
११) प्रशीक्षण विभाग - उन्नती शंभरकर
युवा आणि विवेक वाहिनी-
संगीता माळवणकर
१२)साँस्कृतिक विभाग-
शशिकांत बनकर
१३) सोशल मिडिया आणि प्रसिध्दी - प्रितम शंभकर
१४)जातीअंत विभाग- रेखा रंगारी
१४) विविध उपक्रम विभाग-
वंदना मेंढे
१५) कायदा विभाग- निखिल बोरिये

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती राज्य कार्यकारणी सदस्य रामभाऊ डोंगरे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर शाखा प्रधान सचिव डॉ सुनिल भगत,

उपाध्यक्ष गौतम पाटील, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर शाखा वैज्ञानिक जाणीव प्रकल्प कार्यवाह देवयानी भगत आणि शोभा पाटील ह्यांनी वरील पदावली साठी काम बघितले.

ह्या प्रसंगी बहुजन सौरभ निवासी संपादिका संध्या राजूरकर प्रामुख्याने उपस्थित होत्या.

# श्रीवर्धन तालुक्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक 2026 चा निकाल जाहीर

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यात पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2026 च्या निकालात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने दमदार कामगिरी करत अनेक मतदारसंघांमध्ये विजय मिळवला आहे. काही ठिकाणी शिवसेना (शिंदे गट), भाजप व इतर पक्षांनीही आपली ताकद दाखवली असली, तरी एकूण निकालात राष्ट्रवादीचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून आले.



**जिल्हा परिषद निकाल**

जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या वासंती मंगेश गुणाजी यांनी 12,092 वैध मतांसह दणदणीत विजय मिळवला.

त्यांच्या प्रतिस्पर्धी शारदा देवजी नाईक (भा. शेकाप) यांना 4,057 मते मिळाली, तर नोटा पर्यायाला 1,184 मते पडली.

**पंचायत समिती निकाल**

निर्वाचक गण क्रमांक 101 – दिघी

राष्ट्रवादी काँग्रेसचे सचिन नंदाकर कीर यांनी 4,210 मते मिळवत विजय संपादन केला.

शिवसेना (शिंदे गट)चे हरिदास चंद्रकांत बेडेकर (1,816),

मनसेचे किशोर बबन बिराडी (991),

शिवसेना (उबाठा)चे विनोद लहू साळवी (525),

काँग्रेसचे कमाल युसुफ गीते (190) अशी मतवाटणी झाली.

नोटा: 169 मते

निर्वाचक गण क्रमांक 102 – बोर्ली पंचतन

येथे अटीतटीची लढत पाहायला मिळाली.

शिवसेना (शिंदे गट)चे सुकुमार दत्तात्रय तोंडलेकर यांनी 3,985 मते मिळवत विजय मिळवला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे रमेश दत्तराम घरत यांना 3950 मते मिळाली.

शिवसेना (उबाठा) – योगेश बाळाराम गायकर (1,213),

काँग्रेस – गणेश अनंत वाघे (116),

नोटा: 169 मते

निवडणूक विभाग क्रमांक 52 – आराठी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैभवी मंगेश कोमनाक यांनी 8,384 मते मिळवत स्पष्ट विजय मिळवला.

शिवसेना (शिंदे गट)च्या अक्षदा अविनाश कोलंबेकर यांना 5,469 मते,

काँग्रेसच्या मैमुना इकबाल राऊत यांना 357 मते मिळाली.

नोटा: 191 मते

निर्वाचक गण क्रमांक 103 – आराठी

भारतीय जनता पार्टीच्या पूजा प्रशांत नाईक यांनी 4,109 मते मिळवत विजय संपादन केला.

शिवसेना (शिंदे गट) – श्रुतिका श्रीकांत शेलार (2,161),

काँग्रेस – स्वप्नाली संतोष मोहिते (751),

नोटा: 168 मते

निर्वाचक गण क्रमांक 104 – बागमांडला

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी 4,041 मते मिळवत बाजी मारली.

शिवसेना (शिंदे गट) – वर्षा नितीन जोशी (2,311),

शिवसेना (उबाठा) – प्रचिती प्रथमेश बारे (756),

नोटा: 104 मते

या निवडणुकीत राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे

या निकालांमुळे श्रीवर्धन तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची पकड अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले असून, आगामी स्थानिक राजकारणावर या निकालांचा मोठा प्रभाव पडण्याची शक्यता आहे. विविध पक्षांमध्ये चुरस दिसून आली असली, तरी मतदारांनी खासदार सुनीलजी तटकरे आणि आमदार आदितीताई तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला असल्याचे चित्र आहे. राष्ट्रवादी आणि भाजपच्या विजयी उमेदवारांची मिरवणूक काढून जल्लोष साजरा करण्यात आला.

# महावितरणचे 'स्मार्ट टीओडी मीटर': सवलतीचा नवा प्रकाश;ग्राहकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/नागपूर विभाग** : तंत्रज्ञानाच्या युगात घड्याळे, मोबाईल आणि टीव्ही ज्याप्रमाणे 'स्मार्ट' झाले, त्याच धर्तीवर आता महाराष्ट्रातील वीज व्यवस्थाही कात टाकत आहे. महावितरणने राज्यातील 3 कोटी 16 लाख ग्राहकांसाठी 'स्मार्ट टीओडी (Time of Day)' वीज मीटर आणले असून, यामुळे ग्राहकांना केवळ अचूक बिलच मिळणार नाही, तर चक्क वीज दरात सवलत मिळवण्याची सुवर्णसंधीही उपलब्ध झाली आहे.

या नवीन उपक्रमाबाबत काहीविघ्नसंतोषींकडून गैरसमज पसरवले जात असले, तरी वस्तुस्थिती मात्र अत्यंत फायदेशीर आणि ग्राहकभिमुख आहे.

स्मार्ट टीओडी मीटर हे डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित आहे. यात दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेनुसार




वीज वापर मोजण्याची सुविधा आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सकाळी 9 ते सायंकाळी 5 या कालावधीत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट 80 पैसे ते 1 रुपया पर्यंत सवलत मिळणार आहे. 1 जुलै 2025 पासून ही सवलत लागू झाली असून, घरगुती ग्राहकांसाठी अशा प्रकारची ही पहिलीच ऐतिहासिक सवलत आहे.

जर तुम्ही दरमहा 100 युनिट वीज वापरत असाल, तर जुन्या दरानुसार तुमचे बिल साधारण 875 रुपये येत होते. नवीन दरकपात आणि स्मार्ट मीटरच्या टीओडी सवलतीमुळे हेच बिल आता फक्त 784 रुपयांपर्यंत खाली येऊ शकते. म्हणजे तंत्रज्ञानाचा वापर करून तुम्ही थेट तुमचे पैसे वाचवू शकता.

नवीन स्मार्ट मीटर बसवण्यासाठी ग्राहकांना एकही पैसा द्यावा लागणार नाही. हे मीटर 100 टक्के मोफत लावले जात आहेत. अचूक रीडिंगमुळे 'सरासरी' किंवा 'अंदाजे' बिलांचा त्रास संपणार आहे. जेवढी वीज वापरली, तेवढेच बिल येणार. हे मीटर पूर्णपणे पोस्टपेड आहेत. सध्याच्या मासिक पद्धतीप्रमाणेच ग्राहकांना बिल भरायचे आहे. महावितरणच्या खास 'ॲप'वर तुम्हाला तासागणिक किती वीज वापरली जात आहे, याची माहिती मिळेल. घर बंद असले तरी मीटर रीडिंग आपोआप मुख्यालयात नोंदवले जाईल.

**सौर ऊर्जा ग्राहकांसाठी 'वरदान'**

'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने' अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प लावणाऱ्या ग्राहकांसाठी हे मीटर अत्यंत उपयुक्त आहे. हे मीटर नेट-मीटरिंगचे कामही करते, ज्यामुळे तुम्ही ग्रीडला दिलेली अतिरिक्त वीज आणि स्वत: वापरलेली वीज याचा अचूक हिशेब ठेवणे सोपे होईल.

मीटर बदलणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. यापूर्वी मॅकेनिकल मीटर जाऊन डिजिटल आले आणि आता अधिक प्रगत 'स्मार्ट' मीटर येत आहेत. यासाठी कोणतेही कर्ज काढलेले नसून केंद्र सरकारच्या अनुदानातून हा प्रकल्प राबवला जात असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

"ग्राहकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये. स्मार्ट मीटर हे पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि वीज बिलात सवलत देण्यासाठीच आणले आहेत. तंत्रज्ञानाचा स्वीकार करा आणि घरचे वीजबिल कमी करा," असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# वैध मापन शास्त्र कायद्याचा भंग; दोन परवानाधारकांवर कारवाईचे आदेश

## बेकायदेशीर पैसे वसुलीप्रकरणी सहनियंत्रकांचा कडक पवित्रा

**दैनिक युवक आधार**

**गडचिरोली / नागपूर/प्रतिनिधी सतीश कडू** : वैध मापन शास्त्र अधिनियम २००९ व वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम २०११ अंतर्गत परवान्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याप्रकरणी मेसर्स जनबंधू स्केल सर्विस, प्रो. श्री. अमोल रामेश्वर जनबंधू (विक्रेता परवानाधारक) तसेच मेसर्स ब्लॅक संसुई इलेक्ट्रॉनिक्स वेट, नागपूर, प्रो. श्री. अभिषेक गुम्पलवार (परवानाधारक) हे दोषी आढळून आले आहेत.या प्रकरणी निरीक्षक, वैध मापन शास्त्र, गडचिरोली विभाग यांना संबंधित दोन्ही परवानाधारकांविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. सदर आदेश सहनियंत्रक, वैध मापन शास्त्र विभाग यांनी काढले असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, वरील दोन्ही परवानाधारकांनी लाड हार्डवेअर यांच्याकडून पडताळणी व मुद्रांकनाच्या कामासाठी बेकायदेशीरपणे पैसे वसूल केले. विशेष म्हणजे, ही रक्कम शासकीय कोषागारात जमा न करता स्वतःकडेच ठेवल्यामुळे शासनाची तसेच ग्राहकांची फसवणूक झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.या संपूर्ण प्रकरणाच्या अनुषंगाने तक्रारदाराने दोन्ही आरोपी परवानाधारकांचे सर्व परवाने रद्द करण्यात यावेत, अशी मागणी केली असून, विभागानेही या तक्रारीची गंभीर दखल घेत कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.वैध मापन शास्त्र विभागाच्या या कारवाईमुळे अनधिकृत पैसे वसुली, नियमभंग आणि ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या परवानाधारकांमध्ये खळबळ उडाली असून, भविष्यात अशा प्रकारांवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अजिंक्य तारा सोसायटी येथील सीवर लाईनच्या कामात मनपा एन विभागाच्या परिरक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून कंत्राटदाराची पाठराखण

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(प्रतिनिधी)** : प्रभाग क्रमांक १२७ मधील अजिंक्य तारा सोसायटी येथील सीवर लाईनचे काम हे संबंधित कंत्राटदाराकडून निष्कृष्ट दर्जाचे काम होत असल्याबाबत व संबंधित काम हे वर्क ऑर्डर प्रमाणे विहित कालावधीत सीवर लाईनच्या कंत्राटदारांने पूर्ण न केल्याने कामात कुचराई करणाऱ्या अशा कंत्राटदारावर मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी कारवाई करावी असे याबाबतचे लेखी तक्रार पत्र व त्याबाबतचे पुरावे देखील सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी सहाय्यक आयुक्त एन विभाग यांना दिले होते.तसेच सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ही संबंधित सीवर लाईनच्या कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी केली होती. परंतु संबंधित मनपा एन विभाग परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता आणि त्यांचे अधिकारी यांनी कंत्राटदाराचीच याठिकाणी पाठराखण करून कंत्राटदाराने विहित कालावधीत काम पूर्ण न केल्याने कंत्राटदारावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही.तसेच सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे करण्यात आलेली लेखी तक्रार व परिरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर हे माझी दिशाभूल करणारे असून परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता हे संबंधित सीवर लाईनच्या कंत्राटदाराला याठिकाणी पाठीशी घालून त्याला वाचवत असल्याचे याठिकाणी स्पष्ट दिसत आहे.सामाजिक कार्यकर्ते केतन भोज हे याबाबत उप आयुक्त परि -०६ यांच्याकडे या संबंधित सर्व प्रकरणाबाबत भेट घेऊन मनपा एन विभाग परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता यांच्या अशा भोंगळ कारभाराबाबत व सीवर लाईनच्या कंत्राटदारावर कारवाई करावी अशी मागणी करणार असून ते पुढे देखील नगर विकास विभागाचे मूख्य सचिव यांना देखील याबाबत पत्र देऊन कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज हे करणार आहेत,तसा वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा देखील करणार आहेत.

# सुहितच्या विद्यार्थ्यांनी स्पेशल ऑलिम्पिक नॅशनल ॲथलेटिक्स गेम्स मध्ये दैदीप्यमान यश मिळवून महाराष्ट्राचे नाव उंचावले

**दैनिक युवक आधार**

**पेण / प्रतिनिधी** : ५ व ६ फेब्रुवारी २०२६, रोजी रोहतक, हरियाणा येथील *स्पेशल ऑलिम्पिक भारत* आयोजित नॅशनल ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडल्या. या नॅशनल स्पर्धामध्ये *संपूर्ण देशातील २७ राज्यांमधील ५१० दिव्यांग खेळाडूंनी* सहभाग घेतला होता. या स्पर्धामध्ये सुहित जीवन ट्रस्ट, पेण येथील विद्यार्थीनी *कु. सिद्धीका मंदार पाटील १०० मीटर धावणे यात रौप्य पदक* तसेच जॅवलिंग रौप्य




पदक पटकावले. तसेच *कु. अर्जुन पांडुरंग वारे - रनिंग लाँग जंप - रौप्य पदक* मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ही बाब *केवळ संस्था व रायगड जिल्ह्यासाठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी अत्यंत अभिमानाची आहे* त्यामुळे अर्जुन व सिद्धिका यांच्यावर संपूर्ण महाराष्ट्रातून अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे. या यशामागे या विद्यार्थ्यांचे पालक, संस्थेचे विश्वस्त,प्रशिक्षक अमोल काईनकर तसेच सर्व शुभचिंतक व हितचिंतक यांचा मोलाचा सहभाग आहे.

# युवारंगा'त तरुणाईची 'कलारंगा'ची उधळण –युवारंग युवकांच्या स्वप्नांना पूर्ण करणारा मंच – डॉ. शामराव कोरेटी

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक/ नागपूर विभाग** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित युवक महोत्सव 'युवारंगा'त तरुणाईकडून 'कलारंगा'ची उधळण होत आहे. विद्यापीठाच्या युवक महोत्सवाचा उद्घाटन समारंभ अंबाझरी मार्गावरील गुरुनानक भवन येथे सोमवार, दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडला. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी 'युवारंग' हा युवकांच्या स्वप्नांना पूर्ण करणारा मंच असल्याचे सांगितले.




माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अजय चव्हाण, डॉ. योगेश भुते, अधिसभा सदस्य ॲड. मनमोहन वाजपेयी, श्री. राहुल हनवते, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळ, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन यांची उपस्थिती होती. युवक महोत्सवातून बौद्धिक आणि सांघिक भावना निर्माण होत असून प्रत्येक विद्यार्थ्यास आपले कलागुण सादर करण्यासाठी व्यासपीठ खूले असल्याचे डॉ. कोरेटी यांनी पुढे बोलताना सांगितले. आपल्या विविध कलागुणांना संपूर्ण जग पाहत असून आपले सर्वोच्च नैपुण्य सादर करावे, असे आवाहन डॉ. कोरेटी यांनी यावेळी केले.

प्रास्ताविक करताना विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ.विजय खंडाळ यांनी सांस्कृतिक कलागुणांची उधळण करणारा युवारंग असल्याचे सांगत २८ वर्षांपासून सुरू असलेला युवक महोत्सवात कलावंत विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. युवक महोत्सवात एकूण २२ स्पर्धा होणार असून विविध महाविद्यालयातील विद्यार्थी या महोत्सवात सहभागी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अजय चव्हाण यांनी युवारंग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा मंच असल्याचे सांगत सहभागी विद्यार्थ्यांनी उंच भरारी घेण्याचे आवाहन त्यांनी केले. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. योगेश भुते यांनी एका छताखाली विविध कलागुण विद्यार्थी सादर करणारा हा युवक महोत्सव असल्याचे सांगितले. देशाला घडवायचे असेल तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार युवकांच्या कलागुणांना आकार देण्याचे काम या युवक महोत्सवाच्या माध्यमातून होत आहे. विद्यापीठाची शिक्षण प्रणाली विद्यार्थी केंद्रित होत असून स्वतः सोबत स्पर्धा करीत स्पर्धकांच्या भावनेने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. कलागुणांना व्यावसायिक संधी म्हणून उपलब्ध करून देणारा विद्यापीठाचा युवक महोत्सव असल्याचे अधिसभा सदस्य ॲड. मनमोहन वाजपेयी यांनी सांगितले. या युवक महोत्सवात कला रंग उधळण्याचे आवाहन त्यांनी केले. अधिसभा सदस्य श्री राहुल हनवते यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार श्री प्रकाश शुक्ला यांनी मानले.

**सुरांची उधळण**

युवक महोत्सवात पहिल्या दिवशी विविध गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये समूहगीत स्पर्धेत २१, शास्त्रीय संगीत स्पर्धेत २०, सुगम संगीत स्पर्धेत ४७, शास्त्रीय ताल स्पर्धेत १३, ताण वाद्य स्पर्धेत ११ संघ सहभागी झाले.

# इस्त्रोच्या भेटीसाठी अर्जुन पवार ची निवड

## अति दुर्गम भागातील मौजे तांदळा गावाचा आदर्श ठरला अर्जुन पवार

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी: सय्यद ईसा** : माहूर तालुक्यातील अतिदुर्गम डोंगरदऱ्यात वसलेल्या तसेच एकेकाळी नक्षल चळवळीने गाजलेल्या मौजे तांदळा येथील अर्जुन पवार याची राज्यस्तरीय निवड परीक्षेतून बेंगलोर येथील भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रोला भेट देण्यासाठी निवड झाल्याने अर्जुन पवार यांचे गावकऱ्यासह तालुका भरातून अभिनंदन होत आहे

वडिलांचे छत्र हरवलेल्या अर्जुन नारायण पवार याची आई मोलमजुरी करते तर मोठा भाऊ बारावीत शिक्षण घेत आहे शिक्षणाची आवड असल्याने आई मालाबाई पवार हिच्याकडे जिद्द धरत त्याने इयत्ता नववीत




आमणी तालुका महागाव येथील टी जी देशमुख माध्यमिक आश्रम शाळा येथे प्रवेश घेतला शिक्षण सुरू असतानाच महाराष्ट्र राज्य इतर मागास व बहुजन कल्याण विभाग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निवड परीक्षेतून भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रो बेंगलोर येथे भेटीसाठी त्यास पात्र ठरविण्यात आले

या भेटीचा संपूर्ण खर्च शासनामार्फत करण्यात येत असून, अर्जुन पवार यांनी आपल्या कष्ट, बुद्धिमत्ता व जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन करून शाळेचे, पालकांचे आणि संपूर्ण तांदळा गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामपंचायत कार्यालय तांदळा,सर्व शिक्षकवृंद, तसेच सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील व तंटामुक्ती समिती अध्यक्ष ग्रामस्त यांच्याकडून अर्जुन नारायण पवार यांचे भरभरून कौतुक शुभेच्छांचा वर्षावहोत असून अर्जुनचे हे यश गावातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

# भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये आठवणी, कृतज्ञता आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छांसह भावपूर्ण निरोप सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**रिसोड. रणजितसिह. ठाकूर :** रिसोड तालुक्यातील नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील एकमेव भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या कला, वाणिज्य, विज्ञान शाखेच्या विद्यार्थिनींनी इयत्ता बारावीच्या विद्यार्थिनींना सस्नेह निरोप दिला. निरोप समारंभाच्या अध्यक्षा आदरणीय प्राचार्या मंजुषा सु.देशमुख मॅडम, आदरणीय पर्यवेक्षक सुनील डाहळके सर, ज्येष्ठ क्रीडा सुधीर देशमुख सर, वर्ग बारावीचे वर्गशिक्षक प्रा.पी.एच. मोरे , अभिषेक टिकाईत,प्रा.चंद्रशेखर हिरे व इयत्ता अकरावीचे वर्गशिक्षक प्रा. गुलाब साबळे , प्रा. वृषाली देशमुख , प्रा.साधना बोरकर यांच्या सह जवळपास 300 विद्यार्थिनींच्या उपस्थितीत भावपूर्ण,कृतज्ञतापूर्वक, सस्नेह निरोप समारंभ पार पडला. प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. त्यानंतर कु.तृप्ती



सदार हीने कार्यक्रमाचे उत्कृष्ट प्रास्ताविक केले. त्यानंतर विद्यार्थिनींचे आठवणींना उजाळा देत मनोगते व्यक्त केली. त्यामध्ये कु.किरण कैलास पवार, आरती दीपक साळवे, साक्षी गायकवाड, यशोदा लिंगे, अनन्या वाठोरे, अनुराधा पवार, पुजा जाधव, निकिता खोडके,सना पठाण, अनुष्का अवचार, सानिका खोडके, पुनम कांबळे, सिद्धी तायडे या विद्यार्थिनींनी महाविद्यालयाच्या प्राचार्या,पर्यवेक्षक व सर्व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच हे महाविद्यालय आमच्या आयुष्यातला प्रगतीच्या वळणावरचा एक टप्पा कसे ठरले असे विचार आपल्या मनोगतपर भाषणातून व्यक्त केले. तदनंतर प्रा. पांडुरंग मोरे, प्रा. अभिषेक टीकाईत, प्रा. चंद्रशेखर हिरे, या बारावीच्या वर्ग शिक्षका व्यतिरिक्त प्रा. पंजाब पानझाडे, प्रा.गोपाल वाझुळकर, प्रा. ज्ञानेश्वर भुतेकर ,प्रा. विजयमाला आसनकर,प्रा. दीपिका पुंड, प्रा. विजया मिटकरी या सर्व शिक्षक- शिक्षकेनी आपले मार्गदर्शन पण मनोगतुन परीक्षेच्या काही टिप्स देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे पर्यवेक्षक सुनील डहाळके सर यांनी आपल्या मनोगतातून या महाविद्यालयात मिळालेली संस्कार हे तुम्हाला प्रत्येक वळणा वळणावर आयुष्यात कसे उपयोगी पडतील याची जाणीव करून दिली. शेवटी महाविद्यालयाच्या प्राचार्या मंजुषा सु. देशमुख मॅडम यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना मुलींना शिक्षणाबरोबर संस्कार शील चारित्र्य हे खरे आयुष्यातील दागिने आहे. हे जपले तर आयुष्य नक्कीच सुंदर होईल असा सुचक सल्ला दिला. विद्यार्थिनी आणि शिक्षक आपले मनोगत व्यक्त करतात भाऊक झाले होते. या भावनिकतेच्या प्रसंगातून बाहेर काढण्यासाठी विनोदी प्रा. अभिषेक टिकाईत सर यांनी प्रश्नमंजुषा छोटेखानी कार्यक्रम घेऊन विद्यार्थिनींना स्वतः बक्षीसे दिली.या नंतर सर्वांनी स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला. या निरोप समारंभाचे बाहरदार सूत्रसंचालन कु. किरण सदार व सहनिवेदिका कु. प्रियंका ढोले यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु.पायल शिंदे हीने केले. कार्यक्रमाची सांगता फोटोसेशन ने करण्यात आली. व शेवटी जड अंतकरणाने विद्यार्थिनींनी महाविद्यालयाचा निरोप घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे दादा रवी कुतमारे, सोमेश्वर मखमले, संदीप कस्टे, विजय देशमुख यांनी खूप परिश्रम घेतले.

# खैरी ग्रामपंचायतच्या वतीने खेळ,क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न ; जि .प .प्रा .कन्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी जिंकली खैरी ग्रामवासीयांची मने

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी** : तालुक्यातील खैरी येथे २६ जानेवारी पासून प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी खैरी ग्रामपंचायतच्या वतीने खेळ, क्रीडा व चार दिवसीय शालेय सांस्कृतिक कला महोत्सव मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. २२ ते २४ जानेवारीपर्यंत शालेय खेळ व क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या तसेच सांस्कृतिक कार्यक्रम २६ जानेवारीपासून सुरू होऊन २९ जानेवारी असा चार दिवसाचा सांस्कृतिक कला महोत्सव होता परंतु दोन दिवसाचे सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यानंतर माननीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूमुळे व तीन दिवसाचा दुखवटा असल्यामुळे पुढील दोन दिवसाचे कार्यक्रम २ ते ३ फेब्रुवारी



रोजी घेण्यात आले त्यात अजित दादांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या खेळ क्रीडा व सांस्कृतिक कला महोत्सवाचे उद्घाटन वडकी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव भोरखेडे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ग्रामपंचायत सरपंच श्रीकांत राऊत ग्राम विकास अधिकारी जयश्री पाटील तसेच ग्रामपंचायत चे सर्व सदस्य व सर्व शाळेचे मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपस्थितीत होते.

या तीन दिवसीय खेळ व क्रीडा व चार दिवसीय सांस्कृतिक कला महोत्सवांमध्ये खैरी गावातील चारही शाळेचे विद्यार्थी तसेच अंगणवाडी व कॉन्व्हेंट च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषद उच्च माध्यमिक केंद्र शाळा,प्राथमिक कन्या शाळा, लोक विद्यालय,यशवंत विद्यालय तसेच कॉन्व्हेंट व अंगणवाडी सहभागी झाल्या होत्या. या सांस्कृतिक कला महोत्सवामुळे खैरी गावातील नागरिकांना शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त गुण व कला पहावयास मिळाल्या तसेच सर्वच शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या कलागुणांनी नागरिकांना मनमोहीत केले. हे सांस्कृतिक कार्यक्रम चारही दिवस रोज संध्याकाळी सुरू होत होते व रात्री दहा ते अकरा वाजेपर्यंत चालत होते. या सांस्कृतिक कार्यक्रमात चिमुकल्यांनी आपल्या कलागुणांनी गावाकऱ्यांना मनमोहीत केले.या कार्यक्रमांना गावातील नागरिकांकडून प्रेक्षकांकडून भरपूर असा प्रतिसाद मिळाला.विशेष करून जिल्हा परिषद कन्या शाळा च्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी खैरी ग्रामवासियांची मने जिंकली तसेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळा यांनीही प्रेक्षकांना मनमोहीत केले तसेच लोक विद्यालय यशवंत विद्यालय अंगणवाडी कॉन्व्हेंट च्या मुलांनीही आपले अंगचे कलागुण दाखवले.

या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये बालचिमुकल्या कलावंतांनी सर्व प्रेक्षकांना नृत्य व नाटिका व भारुड सादर करून गावकऱ्यांची मने जिंकली.३ फेब्रुवारी रोजी खेळ क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे समारोप राळेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी केशव पवार यांच्या हस्ते सर्व शाळा अंगणवाडी व कॉन्व्हेंटला ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले तसेच या कार्यक्रमात खैरी गावातील सात पत्रकारांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात गटविकास अधिकारी यांनी खैरी ग्रामपंचायतचे खेळ क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम घेतल्याबद्दल अभिनंदन व कौतुक केले व तालुक्यात ग्रामपंचायत द्वारे अशा पद्धतीचे आयोजन करणारी खैरी ग्रामपंचायतच आहे असे सांगितले. ह्या कार्यक्रमाचे आयोजन खैरी ग्रामपंचायतने केले असून त्यांनी हे कार्यक्रम साजरे होण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. ह्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायतचे सरपंच श्रीकांत राऊत, ग्रामविकास अधिकारी जयश्री पाटील सदस्य रवींद्र निवल,प्रमोद बोडे,सदस्या सौ.लता पवार,सौ. रमा वनकर,सौ.सरला गवारकर व शीतल दोडके तसेच ग्रामपंचायत कर्मचारी राहुल मानकर ,स्वप्निल गोपने, विशाल पाटील,बंटी फुलकर,आकाश क्षिरसागर यांनी अथक परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडले.

# आदिवासी प्राजक्ता आत्राम यांना संतूर नाम पुरस्कार जाहीर




**दैनिक युवक आधार**

**नागपूर | प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर** : नागपूर येथील आदिवासी समाजातील सौ. प्राजक्ता आदित्य ताराम यांनी नागपूर येथील 'संतूर मॉम' स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत Mrs. Tal_ ented तसेच Mrs. Runner-Up हा मानाचा किताब पटकावला आहे. हा पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा रायजादा (ये रिश्ता क्या कहलाता है फेम) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

नागपूरच्या आदिवासी समाजातील पहिली महिला म्हणून हा किताब मिळवण्याचा मान सौ. प्राजक्ता ताराम यांना मिळाला असून ही बाब संपूर्ण शहरासाठी अभिमानास्पद ठरली आहे. त्यांच्या या यशामुळे केवळ कुटुंबियांचाच नव्हे तर संपूर्ण समाजाचा गौरव वाढला आहे.

त्यांच्या या कामगिरीमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास आणि नव्या उमेदीची प्रेरणा निर्माण झाली आहे.

# UGC कायदा : उच्च शिक्षणाच्या शुद्धीकरणाकडे एक निर्णायक पाऊल

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्स्ना करवाडे/विदर्भ संपादक** : आज भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था अनेक गंभीर प्रश्नांना सामोरी जात आहे. खाजगीकरणाचा अतिरेक, बनावट विद्यापीठे, निकृष्ट दर्जाचे अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांची आर्थिक लूट आणि संशोधनातील घसरण. या पार्श्वभूमीवर UGC (University Grants Commission) कायदा प्रभावीपणे अमलात आणणे ही काळाची गरज बनली आहे.

UGC कायदा हा केवळ प्रशासकीय नियम नसून, तो विद्यार्थीहित, शैक्षणिक गुणवत्ता आणि राष्ट्रीय बौद्धिक विकासाचा कणा आहे.

UGC कायदा काटेकोरपणे अमलात आल्यास मान्यता नसलेलली विद्यापीठे व महाविद्यालये बंद होतील. बनावट पदव्या देणाऱ्या संस्थांवर कायदेशीर कारवाई होईल. यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचेल. UGC कायद्यानुसार अभ्यासक्रमांची गुणवत्ता, शिक्षकांची पात्रता, संशोधनाचे निकष हे सर्व ठरावीक मानकांनुसार असणे बंधनकारक आहे. यामुळे भारतामध्ये समान दर्जाचे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध होईल. यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक शोषण थांबेल. खाजगी शिक्षण संस्थांकडून अवाजवी फी, लपविलेले शुल्क बंधनकारक देणग्या यावर UGC कायद्यामुळे नियंत्रण येते.शिक्षण व्यवसाय न राहता सेवा बनेल, हीच या कायद्याची खरी ताकद आहे.

यामुळे शिक्षकांचे हक्क व स्वायत्तता सुरक्षित राहील.

UGC कायदा शिक्षकांसाठीवेतनश्रेणी, सेवा अटी, पदोन्नतीचे निकष स्पष्ट करतो. यामुळे शिक्षकांमध्ये स्थैर्य येते आणि ज्ञाननिर्मितीला चालना मिळते. UGC च्या मार्गदर्शक तत्त्वांमुळेसंशोधनासाठी निधी, नैतिकतागुणवत्ता नियंत्रण यावर भर दिला जातो. यातून देशाला विचारवंत, वैज्ञानिक आणि समाजाभिमुख संशोधक मिळतात. या कायद्यानेसामाजिक न्याय व समान संधी उपलब्ध होते. UGC कायदा आरक्षण धोरण, SC/ST/OBC/अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे हक्क यांची अंमलबजावणी सुनिश्चित करतो. शिक्षण ही मोजक्यांची मक्तेदारी न राहता सर्वांसाठी खुले व्यासपीठ बनते.एकंदरीत UGC कायदा प्रभावीपणे अमलात आणणे म्हणजे शिक्षणाचा दर्जा वाचवणे, विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित करणे, देशाच्या बौद्धिक संपत्तीचे संरक्षण करणे होय.आज गरज आहे तो कायदा कागदावर न ठेवता जमिनीवर उतरवण्याची. कारण शिक्षण मजबूत असेल, तरच समाज जागरूक आणि राष्ट्र सक्षम बनेल.

# मा . पोलीस अधीक्षक गोंदिया यांच्या निर्देशान्वये–अंमली पदार्थ वाहतूक करणाऱ्या आरोपीकडून ९८५ ग्रॅम गांजा व १ मोटर सायकल असा एकूण १,१९,७००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त – स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया पथकाची दर्जेदार कारवाई

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/जिल्हा प्रतिनिधी गोंदिया** : पोलीस अधीक्षक गोंदिया मा. श्री गोरख भामरे, यांचे निर्देश सूचनाप्रमाणे जिल्ह्यात अवैधरित्या अंमली पदार्थ गांजाची विक्री, वापर, साठा व वाहतूक करणाऱ्या विरुद्ध धाड कारवाई करण्यासाठी निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने आज दिनांक ०७/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया च्या पोलीस पथक जिल्हा हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदार कडून माहिती प्राप्त झाली कि मौजा कारंजा ते फुलचूर रोडवरून १ इसम मोटर सायकल ने अंमली पदार्थ गांजाची वाहतूक करून घेऊन जाणार आहे.

मिळालेल्या गोपनिय खात्रीशिर माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक, श्री पुरुषोत्तम अहेरकर, स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात व नेतृत्वात पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामीण अंतर्गत कारंजा ते फुलचूर रोडवर अंमली पदार्थ गांजा बाळगून वाहतूक करणाऱ्या एक आरोपीविरुद्ध कारवाई करण्यात आलेली आहे. आरोपी किशोर सुहाकार हातझाडे वय ३४ वर्ष राहणार मालकानपूर तालुका अर्जुनीमोर जिल्हा गोंदिया यास खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामीण येथील कारंजा ते फुलचूर रोडवर पंचासमक्ष ताब्यात घेऊन अंगझडती घेण्यात आली. अंगझडतीत आरोपीजवळ असलेल्या प्लास्टिक पिशवीमध्ये पाहणी करण्यात आली असता प्लास्टिक पिशवीमध्ये १) सेलो टेपनी गुंडाळलेले १ बंडल ज्यामध्ये ९८५ ग्रॅम ओलसर पाने, फुले, बिया मिश्रित गांजा किंमती १९,७००/- रुपये, २) आरोपीकडे असलेल्या बजाज कंपनीचा पल्सर मोटर सायकल किमती १,००,०००/- व इतर साहित्य असा एकुण किंमती १,१९,७००/- रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. तो पंचासमक्ष कायदेशीर प्रक्रिया करून जप्त करून आरोपीस



गांजाबाबत विचारपूस केली असता मिळून आलेल्या अंमली पदार्थ गांजा हे विक्री करिता घेऊन जात असल्याचे सांगितले तरी त्याचे विरोधात पोलीस ठाणे गोंदिया ग्रामीण येथे सहायक फौजदार भुवनलाल देशमुख , नेमणूक स्थागुशा गोंदिया यांचे तक्रारी वरून गुन्हा क्रमांक ८३/२०२६ एन. डी.पी. एस. कायद्या कलम 8 (क), 20 (ब), (दोन)(अ ), अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांचे निर्देश सूचना प्रमाणे गोंदिया ग्रामीण पोलीस करीत आहेत...सदरची दर्जेदार धाड कारवाई पोलीस अधीक्षक गोंदिया मा. श्री. गोरख भामरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पुरुषोत्तम अहेरकर, सहायक फौजदार राजू मिश्रा, भुवनलाल देशमुख , पोहवा महेश मेहर, पोहवा संजय चौहान, पोहवा इंद्रजित बिसेन, पोहवा प्रकाश गायधने, पोशि छगन विठ्ठले, मपोशि स्मिता तोंडरे, कुमुद येरणे , चापोशि राम खंदारे, यांनी कारवाई केलेली आहे..

# महाराष्ट्र राज्य पाणी स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व जलजीवन मिशन अंतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन, सेवा-सुरक्षा व सामाजिक संरक्षणाबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीने राज्य सरकारकडे केली असल्याचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड कार्याध्यक्ष सचिन जाधव



उपाध्यक्ष ऋषिकेश शिलवंत उपाध्यक्ष बंडू हिरवे यांनी आझाद मैदानात आंदोलन दरम्यान सांगितले.

याबाबतचा निवेदनपत्र ४ फेब्रुवारी २०२६ रोजी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रधान सचिवांना देण्यात आले आहे.

राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छता, पाणीपुरवठा, जनजागृती, क्षमता बांधणी आणि घराघरात नळजोडणी (हर घर जल) यांसारख्या महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांचे गेल्या ऑक्टोबर २०२५ पासून मानधन प्रलंबित असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. निधीअभावी ही परिस्थिती निर्माण झाली असून, यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.असे सचिन जाधव व संदीप पाटील यांनी सांगितले.

या कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळे राज्यातील हजारो गावे ओ डी एफ प्लस घोषित झाली असून हजारो गावे 'हर घर जल' म्हणून प्रमाणित झाली आहेत. मात्र, इतके महत्त्वाचे काम करूनही कर्मचाऱ्यांना मानधन, आरोग्य व सामाजिक सुरक्षा सुविधा मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# कांदा बाजारभावातील घसरण थांबविणेसाठी शासन स्तरावर उपाययोजना करावी. – ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी/ महेश साळुंके लासलगाव :** कांदा बाजारभावातील घसरण थांबविणेसाठी शासन स्तरावर उपाययोजना करणेबाबत लासलगांव बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप यांनी केंद्र व राज्य शासनास निवदेन देऊन विनंती केलेली आहे.

यासंदर्भात लासलगांव बाजार समितीच्या वतीने केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, अर्थ मंत्री निर्मला सितारामन, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्राताई पवार, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे व दिंडोरी लोकसभा मतदार संघाचे खासदार भास्कर भगरे यांना निवेदन देऊन कळविणेत आले की, लासलगांव बाजार समितीच्या मुख्य व उपबाजार आवारांवर सध्या खरीप / लेट खरीप (पोळ / रांगडा) कांदा मोठ्या प्रमाणावर विक्रीस येत असुन दररोज साधारणतः 40 ते 50 हजार क्विंटलची आवक होत आहे.

चालु वर्षी नाशिक, सोलापूर, अहिल्यानगर आदि जिल्ह्यांसह राज्यात कांद्याच्या लागवडीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये कांद्याची आवक सुमारे 30 ते 40 टक्क्यांनी वाढल्याने मागणी आणि पुरवठ्यातील असमतोलामुळे बाजारभावात मोठी घसरण झालेली असुन सद्यस्थितीत लासलगांव बाजार समितीत सदरचा कांदा कमीत कमी रू. 500/-, जास्तीत जास्त रू. 1,485/- व सर्वसाधारण रू. 1,100/- प्रति क्विंटल ह्या दराने विक्री होत आहे. सध्या विक्रीस येत असलेला कांदा हा साठवणी योग्य नसल्याने शेतकरी बांधवांना तो काढणीनंतर लगेचच विक्री करावा लागतो. त्यामुळे उत्पादन खर्चाचा विचार करता शेतकरी बांधवांना प्रति क्विंटल रू. 600/- ते 700/- रूपयांचा तोटा सहन करावा लागत आहे.

तसेच चालु वर्षी ठिकठिकाणी अवकाळी पाऊस झाल्याने येथील शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. चालु वर्षी महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सोलापुर या जिल्ह्यांसह गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, कर्नाटक व पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कांद्याचे उत्पादन झाल्याने देशांतर्गत कांद्याची मागणी कमी होत असुन दिवसेंदिवस कांदा बाजारभावात घसरण होत आहे. मागणीअभावी कांदा बाजारभावात सतत घसरण सुरू असल्याने केंद्र शासनाच्या ध्येय धोरणांबाबत शेतकरी बांधवांमध्ये असंतोष निर्माण होत असुन नाशिक जिल्ह्यात दररोज त्यांचेकडुन ठिक ठिकाणी कांदा लिलावाचे कामकाज बंद पाडुन आंदोलन व रस्ता रोको होत आहे.

वर नमुद बाबींचा विचार करता सध्या बाजार समित्यांमध्ये विक्रीस येत असलेल्या खरीप / लेट खरीप (पोळ / रांगडा) कांद्याच्या दरातील घसरण थांबविणेसाठी शासन स्तरावर 1) भारताचा प्रमुख निर्यातदार देश असलेल्या बांग्लादेश सरकारशी केंद्र शासनाच्या माध्यमातुन बोलणी करून तेथील सरकारने दिलेले LC (Letter of Cred-it) पुर्ववत सुरू करून कांदा निर्यातीकरीता बांग्लादेश बॉर्डर खुली करणेसाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात यावा. 2) कांदा निर्यातीसाठी फिलीपिन्स, जॉर्डन, युरोपीयन, अमेरीकन व ऑस्ट्रेलियन बाजारपेठांचा आतापर्यंत विचार करण्यात आलेला नाही. सदरच्या बाजारपेठेत कांदा पाठविण्याची व्यवस्था करण्यासाठी तेथील व्यापारी संस्थेशी संपर्क साधणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र सरकारने मार्गदर्शन व निर्यात धोरण ठरविणेही आवश्यक आहे. 3) केंद्र शासनाने स्थापन केलेल्या "किंमत स्थिरीकरण निधी" अंतर्गत नाफेडमार्फत तात्काळ कांदा खरेदी सुरू करणेसाठी नाफेडला आदेश होणेसाठी पाठपुरावा करण्यात यावा. 4) पुर्वी भारतातुन श्रीलंकेत मोठ्या प्रमाणात कांदा निर्यात होत असे परंतू भारताच्या निर्यात धोरणांमुळे श्रीलंकेत कांद्याचे उत्पादन होऊ लागल्याने श्रीलंकेने आयात शुल्क वाढविले आहे. त्यामुळे सदरचे आयात शुल्क कमी करणेसाठी प्रयत्न करावे. 5) देशांतर्गत किंवा परदेशात कांदा पाठविणाऱ्या खरेदीदारांना RoDTEP (Remission of Duties and Taxes on Exported Products) Subsidy वाढवुन देणेसाठी प्रयत्न करण्यात यावे. 6) सध्या श्रीलंका व नेपाळ या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर कांद्याचा तुटवडा निर्माण झालेला असल्याने सदर देशांमध्ये कांदा निर्यात होणेसाठी प्रयत्न करावे. 7) सध्या रेल्वेद्वारे कांदा पाठविणेसाठी BCN रॅक उपलब्ध करून दिल्या जातात. सदर रॅकद्वारे कांदा वाहतुकीसाठी साधारणतः 05 ते 08 दिवसांचा कालावधी लागतो. त्याऐवजी येथील कांदा निर्यातदारांना किसान रेल अथवा त्या धर्तीवर व्यापारी वर्गासाठी स्वतंत्र रेल उपलब्ध करून दिल्यास सदरचा माल 48 ते 60 तासांमध्ये पोहोचविला जाईल. वेळ आणि भाडेदरातील बचतीमुळे व्यापारी वर्ग अधिकचा मोबदला शेतकरी बांधवांना भाववाढीसाठी देऊ शकतील. 8) सध्या येथील शेतकरी बांधवांना येणाऱ्या उत्पादन खर्चाचा विचार करता शेतीमाल निर्यातीसाठी शासन स्तरावर निर्यातदारांकडुन जे चार्जेस वसुल केले जातात. त्या चार्जेसमधुन जमा होणाऱ्या निधीचा भावांतर योजनेसाठी "भावांतर फंड" म्हणुन स्वतंत्र निधी निर्माण करण्यात यावा व त्या फंडातुनच शेतकऱ्यांना बाजारभाव कमीच्या कालावधीत फरकाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात यावी. अशा उपाययोजना तातडीने करणेबाबत विनंती केलेली आहे.

## रमजान महिन्या मध्ये अमृत नगर ते कौसा या दरम्यान तात्पुरता रिक्षा स्टॅन्ड बनवण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**
**रमेश राऊत/कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** १८ फेब्रुवारी पासून माहे रमजान ची सुरुवात होत आहे मुंब्रा तसेच मुंब्र्याच्या आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव राहत असून अमृत नगर येथे मोठी बाजारपेठ आहे येथे अगदी कपड्या पासून ते खाण्या-पिण्याच्या सर्वच गोष्टी स्वस्त आणि मुबलक प्रमाणात भेटतात. रमजान महिन्यात मुंब्रा तसेच मुंब्र्याच्या आजूबाजूच्या परिसरातील मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव त्याचप्रमाणे इतर धर्मीय सुद्धा येथे खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात येत असतात,त्यामुळे रस्त्यावर भरपूर प्रमाणात गर्दी होते हा रस्ता मुख्य रहदारीचा असल्याने तसेच येथून मुंब्रा स्टेशन जवळ असल्याकारणाने गाड्यांच्या ट्रॅफिकचा सुद्धा मोठ्या प्रमाणात येथे प्रश्न उदभवत असतो त्यामुळे येथे ट्रॅफिक विभागाकडून तसेच मार्केटमधील काही व्यापारी संघटने कडून मोठ्या प्रमाणात रस्त्यावर वॉर्डन तैनात केले जातात. कुठल्याही वाहनाला येथे पार्किंग किंवा थांबू दिले जात नाही त्याच प्रकारे रिक्षावाल्यांना सुद्धा येथील वॉर्डन प्रवासी उतरवण्यास किंवा गाडीमध्ये बसवण्यास गाडी थांबवण्या साठी मज्जाव करीत असतात. त्यामुळे बऱ्याच वेळा रिक्षा चालक आणि येथील वॉर्डन मध्ये शाब्दिक तू तू मै मै तसेच काही वेळा मारहाण झाल्याचेही निदर्शनास आले आहे.

यावेळी ही सर्व परिस्थिती लक्षात घेता मुंब्र्यातील शिवसेना मुंब्रा रिक्षा युनियन ने मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंब्रा वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,मुंब्रा प्रभाग समिती मधील सहाय्यक आयुक्त आणि मुंब्रा-अमृत नगर परिसरातील काही पक्षातील नेतेमंडळींना पत्राद्वारे अमृत नगर ते कौसा पर्यंत रिक्षांकरिता तात्पुरते रिक्षा स्टॅन्ड उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे जेणेकरून रिक्षावाल्यांना प्रवासी भरताना अथवा उतरवताना कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होणार नाही. जर असे स्टॅन्ड उपलब्ध करण्यात आले नाही तर सर्व रिक्षा अमृत नगरच्या अगोदर चा थांबा सोनाजी नगर येथूनच पुन्हा मुंब्रा स्टेशन कडे वळवण्यात येतील असा इशाराही पत्राद्वारे या सर्वांना देण्यात आला आहे.तसेच इशारा देतेवेळी युनियनच्या पदाधिकाऱ्यांन कडून अमृत नगर ते कौसा या दरम्यान राहणाऱ्या सर्व नागरिकांच्या होणाऱ्या गैरसोयीबद्दल दिलगिरी सुद्धा व्यक्त करण्यात आली आहे.

## पंचायत समिती निंबायती गणात शिवसेनेच्या सौ.सविता गव्हांडे विजयी, घोसला गावात जल्लोष

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** तालुक्यात नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपाने बाजी मारली आहे. जिल्हा परिषद आमखेडा गटातील निंबायती गणात शिवसेनेच्या (शिंदे गट) सविता सोपानराव गव्हांडे या विजयी झाल्याने घोसला गावात कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करीत विजयी मिरवणूक काढली. दरम्यान भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष बद्री हजारी राठोड यांच्या परिवाराने निंबायती गणाचे गेल्या




पंधरा वर्षांपासून प्रतिनिधित्व केलेले होते.भाजपने निंबायती गणातून पुन्हा त्यांना मैदानात उतरवले होते. तर त्यांच्या विरोधात घोसला येथील मराठा प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते सोपानराव गव्हांडे यांच्या पत्नी सविता सोपानराव गव्हांडे यांना शिवसेनेने (शिंदे गट) मैदानात उतरवले होते. सविता सोपानराव गव्हांडे यांना ५११० तर भाजपाचे बद्री हजारी राठोड यांना ३६२२ मतदान पडले यात सविता सोपानराव गव्हांडे या १४८८ मतांनी निंबायती गणातून विजयी झाल्या. भाजपाचा अभेद्य गड असलेल्या निंबायती गणात शिवसेनेचा भगवा फडकावला.सौ.सविता गव्हांडे यांच्या विजयात पती सोपानराव गव्हांडे, उपजिल्हाप्रमुख प्रभाकर (आबासाहेब) काळे,मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे, तालुकाध्यक्ष विजय चौधरी,गणेश माळी,गणेश तायडे,सोनु तडवी, वैभव युवरे,आदींसह कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.विजयी उमेदवार सौ. सविता सोपानराव गव्हांडे यांचे गावात जल्लोषात स्वागत करीत औक्षण करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी विजयी मिरवणूक काढली होती. सविता गव्हांडे यांनी मतदारांसह कार्यकर्त्यांचे आभार मानले.

## महादेव उप्पे यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** मागील अनेक वर्षांपासून पत्रकारीता क्षेत्र असो किंवा समितीच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करून गोरगरीब जनतेच्या हितासाठी धडपडणाऱ्या देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथील महादेव शरणप्पा उप्पे यांच्या कार्याची दखल घेत भारत सरकार नोंदणीकृत ग्राहक सेवा सामाजिक बहुउद्देशीय संस्था संचलित ग्राहक रक्षक समितीच्या तृतीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून दि.०८ फेब्रुवारी २०२६ रोज रविवारी हॉटेल सेलिब्रेटी शिखरेवाडी नाशिक येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून,ग्राहक रक्षक समितीच्या संस्थापक अध्यक्षा डॉ.आशाताई पाटील,राष्ट्रीय महिला अध्यक्षा डॉ.ज्योतीताई केदारे



शिंदे,नाशिकचे माजी आमदार कल्याणराव पाटील,शिवसेनेचे उपनेते तथा नाशिक नगरपालिकेचे नगरसेवक अजय बोरस्ते,अन्न व औषध प्रशासन सह आयुक्त महेश चौधरी,वैद्य मापकशास्त्र उपनियंत्रक अनिल गिरनारे राष्ट्रीय प्रवक्ता संजय देशमुख,राष्ट्रीय मार्गदर्शक दिलीप फडोळ यांच्या उपस्थितीत महादेव शरणप्पा उप्पे यांना राष्ट्रीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रतिभाताईपाटील(समाजसेविका),मनिषा कोकरे(सामाजिक क्षेत्र),डॉ.अम्रपाली मोहिते( एक हजाराहून अधिक मुलांचे मातृत्व स्विकारलेले व अनेक सामाजिक कार्यात सहभाग),किसान एकता महासंघाचे देवेंद्रसिंग सोमवंशी अशा अनेकांना राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून हा पुरस्कार वितरण सोहळा धूमधडाक्यात साजरा करण्यात आला आहे.यावेळी कैलाश धीरवाणी(मार्गदर्शक),किशोर ओसवाल(संघटक),तरन्नूम शेख(नाशिक उपाध्यक्षा) व ग्राहक रक्षक समितीचे असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल माधव काईतवाड बोरगडीकर कार्याध्यक्ष,माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिस मित्र समिती नांदेड,जेष्ठ पत्रकार किशोर आडेकर तालुकाध्यक्ष भिमशक्ती सामाजिक संघटना, बालाजी नाईकवाडे तालूका उपाध्यक्ष मराठी पत्रकार संघ, शिवानंद उप्पे श्रीनिवास बिरादार,नंदकुमार वलकले, उमर मौजम अजिजसाब फारुखी,अनंतकुमार बत्तीनवार , प्रसेनजित दावणगीरकर,ॲड. सद्दाम दावणगीरकर,पत्रकार सतिश वाघमारे,पत्रकार संघपाल मदने,किरण पाटील वझरकर सतिश बिरादार, यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रोहन येथे श्री कृष्ण मंदिरचा प्राणप्रतिष्ठा मुर्ती स्थापना सोहळा संपन्न

### भाविक भक्तांनी पाशें ते हजरा महाप्रसाद चा घेतला लाभ

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख :** कल्याण तालुक्यातील रोहन गावांत श्रीकृष्ण मंदिराचा प्रतिष्ठान व मूर्ती स्थापना यांच्या कडुन भंडार्याचा कार्यक्रम ह भ प श्री राजाराम महाराज घावट यांच्या मधुर आवाजात भक्तीगीते साजरी झाली आणि नामांकित भाजणी मंडळाचे भजन झाले लिला याविषयी किर्तन झाल्या नंतर मंदिर समितीच्या वतीने भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाचे उत्कृष्ट



नियोजन येथील

पूर्ण महाआरती महा पुजा प्रार्थना आशीर्वाद समुदाय हरिपाठ नवु जोडप्यांना महा पुजा करण्याचा माणहि मिळाला आहे मंदिर समिती युवा भागीरथी बाई शांताराम बांगर जनार्दन शांताराम बांगर विष्णू जनार्धन बांगर गोकुळ जनार्दन बांगर जयश्री जनार्दन बांगर अनुराधा जनार्धन बांगर व गावातील सर्व गावकरी ग्रामस्थ आणि महिला मंडळ बाळ गोपाळ उपस्थित होते माजी सरपंच तुकाराम चोरगे गोवेली यांनाही श्रीकृष्ण प्राणप्रतिष्ठान यांचे पूजा आरती करायला मान मिळाला आहे

# संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव २०२६'साठी प्रशासन सज्ज

### नियोजनात कोणतीही त्रुटी नको :जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** श्री.संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव २०२६ हा जिल्ह्याच्या सांस्कृतिक परंपरेचा गौरव आणि पर्यटन विकासाचा महत्त्वाचा उपक्रम असल्याने, त्याच्या नियोजनात कोणतीही त्रुटी राहू नये, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

महोत्सवाच्या नियोजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत सुरक्षा, वाहतूक, आरोग्य सेवा, मूलभूत सुविधा व



आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

भाविकांची मोठी उपस्थिती लक्षात घेता, सर्व विभागांनी समन्वयाने व काटेकोरपणे काम करावे, असे त्यांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्था, गर्दी व्यवस्थापन, पर्यायी मार्ग, वाहनतळ, आरोग्य पथके, रुग्णवाहिका आणि प्राथमिक उपचार सुविधांची व्यवस्था वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यक्रमस्थळ व रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावीत तसेच सर्व यंत्रणांनी मास्टर प्लान व मॅप तयार करून नियोजनबद्ध तयारी ठेवावी, असे निर्देश देण्यात आले.

बैठकीस पोलीस अधीक्षक अनुज तारे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख प्रत्यक्ष व दुरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

## लोहमार्गालगत कुंपणामुळे उगांव परिसरातील शेतकऱ्यांची कोंडी ; रस्ते बंद, घराबाहेर पडणेही कठीण, रुग्ण - विद्यार्थ्यांची फरफट

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या लोहमार्गालगत उभारण्यात आलेल्या लोखंडी कुंपणामुळे उगांव परिसरातील अनेक गावांमध्ये शेतीकडे जाणारे तसेच दैनंदिन वापरातील रस्ते बंद झाले आहेत. परिणामी शेतकऱ्यांना त्यांच्या घरातून बाहेर पडणेही कठीण बनले असून शेतीकाम, पाणीपुरवठा, माल वाहतूक आणि शाळकरी मुलांची ये - जा गंभीरपणे प्रभावित झाली आहे.

रस्ते बंद झाल्याने काही ठिकाणी वृद्ध व आजारी नागरिकांना उपचारासाठी वेळेत पोहोचता न आल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या आहेत. शेती लोहमार्गाच्या पलीकडे असल्याने मोठा फेरा मारावा लागत असून, काही भागांत थेट मार्गच उपलब्ध नसल्याने शेतशिवार अक्षरशः कुंपणात अडकले आहे. हा प्रश्न केवळ उगांवपुरता मर्यादित नसून, रेल्वे मार्गालगतच्या जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य नागरिकांनाही भेडसावत असल्याचे सांगण्यात



येते. जिल्ह्यातील खासदार व आमदारांनी पुढाकार घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा, तसेच खासदारांनी संसदेत प्रश्न उपस्थित करून रेल्वे प्रकल्पासाठी जमिनींचे अधिग्रहण कशा स्वरूपात झाले?, किती मोबदला देण्यात आला? आणि शेतकऱ्यांसाठी रस्त्यांची तरतूद आहे की नाही, याबाबत उत्तरे मागावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.दरम्यान, याबाबत तातडीने उपाययोजना न झाल्यास उपोषणाचे हत्यार उपसले जाईल असा इशारा दत्तात्रय सुडके, दिपक पानगव्हाणे, अशोक सुडके, सीताराम मापारी, गंगाधर सुडके, अकिल शेख, मनीषा मापारी, समीर शेख, शांताबाई सुडके, साजिया शेख, मंगला सुडके, पुष्पा पाणगव्हाणे, शांताराम पाणगव्हाणे, शोभा, पानगव्हाणे आदींसह परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

**विकास आवश्यक असला तरी तो उपजीविकेवर घाला घालणारा नसावा. समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर लोहमार्गालगत सर्व्हिस रोड, भुयारी मार्ग किंवा आवश्यक ठिकाणी गेटची तातडीने व्यवस्था करण्यात यावी, ब्रिटिश काळात रेल्वे प्रकल्पासाठी शेतजमिनी अधिग्रहित करण्यात आल्या; त्यावेळी योग्य मोबदला मिळाला नाही आणि आज रस्त्याअभावी शेती करणे अधिकच अवघड झाले आहे.**

**दत्तात्रय सुडके**
**शेतकरी**

# ICNC 2026 – IAPEN इंडिया क्लिनिकल न्यूट्रिशन काँग्रेस; मध्यवर्ती संकल्पना: “हेल्थ केअर सिनर्जी : टेक | ट्रेंड | थेरपीज”

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर** : IAPEN इंडिया – नागपूर चॅप्टर यांच्या वतीने आयोजित क्लिनिकल न्यूट्रिशन काँग्रेस ICNC 2026 चे यशस्वी समारोप 8 फेब्रुवारी 2026 रोजी हॉटेल सेंटर पॉइंट, रामदासपेठ, नागपूर येथे झाले. चार दिवस चाललेल्या या भव्य शैक्षणिक परिषदेने क्लिनिकल न्यूट्रिशन क्षेत्रात ज्ञानवर्धन, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि प्रत्यक्ष उपयोगाभिमुख शिक्षणाचा नवा मानदंड प्रस्थापित केला.

5 ते 8 फेब्रुवारी 2026 दरम्यान आयोजित ICNC 2026 मध्ये 800 पेक्षा अधिक प्रतिनिधी, 170 हून अधिक वक्ते, 25 नामांकित राष्ट्रीय फॅकल्टी तसेच 9 प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी सहभाग घेतला. त्यामुळे ही परिषद देशातील सर्वात मोठ्या क्लिनिकल न्यूट्रिशन परिषदांपैकी एक ठरली.

ही परिषद IAPEN इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शिवशंकर तिम्मनप्याटी यांच्या संरक्षणाखाली तसेच डॉ. मेराज शेख, अध्यक्ष – IAPEN इंडिया नागपूर चॅप्टर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली.

परिषदेचे आयोजक अध्यक्ष (Organising Chair) डॉ. रीटा भार्गव होत्या, तर डॉ. कविता बक्षी आणि डॉ. रेणुका माईंदे यांनी आयोजक सचिव म्हणून महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.

**ESPEN LLL व प्री-कॉन्फरन्स सत्रे (5–6 फेब्रुवारी)**

परिषदेची सुरुवात प्रतिष्ठित ESPEN लाइफ-लाँग लर्निंग (LLL) प्रमाणित कार्यक्रमाने झाली. या कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. शिल्पा वर्मा यांनी केले. यात लठ्ठपणा, वृद्धावस्था, पोट व आतड्यांच्या तक्रारी (जेरियाट्रिक्स, गॅस्ट्रो-इंटेस्टाइनल आजार) व क्रॉनिक इंटेस्टाइनल फेल्युअर या विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर परिषद पूर्व (प्री-कॉन्फरन्स) कार्यशाळा व शैक्षणिक प्रस्तुती पार पडली.

**आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचे योगदान**

ICNC 2026 मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले, त्यामध्ये

प्रो. रोको बाराझोनी, प्रो. मॅथियास पिर्लिख, प्रो. रेमी मेयर, डॉ. आर्थर




व्हॅन झँटन, प्रो. हार्टोनो, डॉ. वाफा, डॉ. फिजी, डॉ. नलिंदा आणि डॉ. सजीथा यांचा समावेश होता.

त्यांनी सार्कोपेनिक ओबेसिटी, ऑन्कोलॉजी न्यूट्रिशन, रीनल न्यूट्रिशन, जेरियाट्रिक न्यूट्रिशन, जीआय न्यूट्रिशन व ICU न्यूट्रिशन यावर जागतिक संशोधनाधारित माहिती भारतीय वैद्यकीय व्यवहाराशी जोडून सादर केली.

**राष्ट्रीय मार्गदर्शक**

परिषदेच्या वैज्ञानिक सत्रांमध्ये डॉ. शशांक जोशी, डॉ. संजय कालरा, डॉ. बी. एम. मक्कर, डॉ. निहार दास यांच्यासह देशभरातील क्रिटिकल केअर, गॅस्ट्रोएंटरोलॉजी, डायबिटोलॉजी, पीडियाट्रिक्स आणि क्लिनिकल डायटेटिक्स क्षेत्रातील अनेक नामवंत तज्ज्ञांनी सहभाग घेतला.

**वैज्ञानिक विषयांची व्यापकता**

एकाच वेळी चालणाऱ्या विविध सत्रांमध्ये AI आधारित न्यूट्रिशन केअर, कुपोषण व मायोस्टेटोसिस, ICU न्यूट्रिशन ॲडिक्वेसी, GLP-1 युगातील पोषण, अवयव-विशिष्ट पोषण (यकृत, मूत्रपिंड, कॅन्सर, फुफ्फुसे, बालरोग व जेरियाट्रिक), सार्वजनिक आरोग्य पोषण, बायोमार्कर्स, रिसर्च रायटिंग व मॉड्युलर न्यूट्रिशन प्रॅक्टिसेस या विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

ही परिषद मार्गदर्शक तत्त्वांची रूग्णालयात अंमलबजावणी (गाईडलाईन्स ते बेडसाईड प्रॅक्टिस )हा उद्देश यशस्वीपणे साध्य करणारी ठरली आणि वैद्यकीय चिकित्सक व आहार तज्ज्ञ (डॉक्टर व डायटिशियन) यांना पुराव्यावर आधारित, प्रत्यक्ष वापरता येणारी पोषण-साधने उपलब्ध करून दिली.

**समारोप व सन्मान**

समारोप सत्रात ॲब्स्ट्रॅक्ट अवॉर्ड्स प्रदान करण्यात आले तसेच रुग्णांच्या उपचार परिणामांमध्ये क्लिनिकल न्यूट्रिशनचे केंद्रस्थानी असलेले महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

या प्रसंगी IAPEN इंडिया – नागपूर चॅप्टर ला MAW विनर चॅम्पियन ट्रॉफी प्रदान करण्यात आली तसेच "बेस्ट चॅप्टर ॲक्टिव्हिटी अवॉर्ड" मध्ये तृतीय क्रमांक मिळाला.

**आभार**

ICNC 2026 च्या यशस्वी आयोजनासाठीडॉ. लेखा श्रीधरन, डॉ. कविता गुप्ता (सायंटिफिक को-चेअर), डॉ. मानसी पाटील, डॉ. रीटा पाटील, सीमा चाळखोरे, गार्गी राय, प्राची सावईकर, विनिता मेहता, मीनल गुज्राथी, डॉ. सोनल कोलते, सुवर्णा नितनवरे, रश्मी बुध्ददेव, सीमा पांडे, मीनल भोयर,

अनामिका मिश्रा, सीमा अग्रवाल, निकिता पाटील, रश्मी लोबो, समिक्षा पिल्लारे, हिमांशु तसेच प्रिझम इव्हेंट्स टीम यांच्या अथक परिश्रमांचे मनःपूर्वक कौतुक करण्यात आले.

नागपूर शहराने अभिमानाने अशा ऐतिहासिक शैक्षणिक परिषदेचे यजमानपद भूषवले, जी भारतातील क्लिनिकल न्यूट्रिशन प्रॅक्टिसवर दीर्घकालीन प्रभाव टाकेल.

# स्वातंत्र्य सैनिक स्व.सुर्यभान पवार स्मरणार्थ राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराने डॉ.राजेंद्र सानप सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** शुक्रवार दिनांक ०६ फेब्रुवारी-२०२६ रोजी परभणी जिल्हा ग्रंथालय संघाच्या ४८ वे वार्षिक अधिवेशन पुर्णा येथे स्वातंत्र्य सैनिक सुर्यभान पवार यांच्या स्मरणार्थ ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यां साठीचा राज्य स्तरीय “ग्रंथमित्र पुरस्कार- २०२६” या वर्षीचा पुरस्कार सार्वजनिक ग्रंथालय चळवळीत ३५ वर्षांपासून स्वतःला वाहून घेणारे सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक क्षेत्रात सक्रिय सहभागी असणारे बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष, मराठवाडा विभागीय ग्रंथालय



संघाचे माजी कोषाध्यक्ष व सध्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सदस्य डॉ.राजेंद्र सानप यांना मराठवाडा विभागाचे सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांच्या हस्ते ग्रंथमित्र पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले. या वेळी राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ.रामेश्वर पवार, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ अध्यक्ष खंडेराव सरनाईक, कार्यवाह राम मेकले, प्रा. डॉ.राजेंद्र कुंभार, डॉ. सुभाष चव्हाण, धर्मराज वीर, सुर्यवंशी यांच्या सह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथमित्र पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले. बीड जिल्ह्यात शासनाच्या “गाव तिथे ग्रंथालय! या धोरणानुसार गावा गावात ग्रंथालय चळवळ उभारली जावी या साठी गेल्या ३५ वर्षापासुन ग्रंथालय क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या ग्रंथप्रेमी डॉ.राजेंद्र सानप यांना राज्यस्तरीय ग्रंथमित्र या पुरस्कार मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या कार्यक्रमास प्रा.विलास वैद्य, राजेंद्र हंबीरे, धनंजय पवार, नरहरी मंठेकर, शेख इब्राहिम, धनंजय सानप, धम्मपाल वैद्य यांच्या सह इतरांची उपस्थिती होती.

# दहावी–बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्तच!

## वाशिम जिल्ह्यात प्रशासनाची कडक मोहीम – जिल्हाधिकारी कुंभेजकर यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम, दहावी व बारावीच्या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या भवितव्याची गुरुकिल्ली! त्यामुळे या परीक्षा पूर्णतः पारदर्शक, निर्भय आणि शंभर टक्के कॉपीमुक्त वातावरणातच पार पाडल्या जातील, असा ठाम निर्धार जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केला आहे.

केंद्र संचालक, पर्यवेक्षक व भरारी पथकांची आढावा बैठक घेताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार, दबाव किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. उपद्रवी केंद्रांवर विशेष नजर ठेवण्यात येणार




असून, गरज पडल्यास तात्काळ कडक कारवाई करण्यात येईल.

यंदा वाशिम जिल्ह्यात तब्बल ४२ हजार ४२५ विद्यार्थी दहावी व बारावीच्या परीक्षेला सामोरे जाणार आहेत. बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान होणार आहे.

परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्हीद्वारे चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, वीजपुरवठा, पंखे, दिवे, जनरेटर यांसारख्या सर्व भौतिक सुविधा आधीच सज्ज करण्यात आल्या आहेत.

उपद्रवी केंद्रांवर अतिरिक्त भरारी पथके, पोलिस बंदोबस्त व प्रशासनाची विशेष नजर राहणार असून, परीक्षा काळात वाशिम जिल्हा पूर्णपणे “अलर्ट मोड”वर राहणार आहे.

एकूणच यंदाच्या दहावी–बारावीच्या परीक्षा म्हणजे — कडक बंदोबस्त, पारदर्शकता आणि कॉपीला ‘झिरो टॉलरन्स’!

# रायगड जिल्हा परिषद विजयी उमेदवार यांने मानले मतदारांचे आभार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** ग्रुप ग्रामपंचायत उमरोली उसर्ली बूद्रुक येथे जिल्हा परिषद महिला विजयी उमेदवार सौ कमला एकनाथ देशेकर यांनी उसर्ली बूद्रुक येथे जावून मतदारांचे मानले आभार त्यांच्या सोबत सौ वर्षाताई प्रशांत ठाकूर माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.रत्नप्रभा घरत नगरसेविका सौ सिताताई पाटील महिला कार्यकर्त्या यांनी भेट देवून ग्रामपंचायत सरपंच बेबी कच्छिद्र ठाकूर उप सरपंच किरण डांगरकर मा. सरपंच नितिन काठावले ग्रा.पं सदस्य प्रितेश डांगरकर पो.पा.दिपक पाटील मा.उपसरपंच पंकज वारदे मा.उपसरपंच संभाजी वारदे जगदीश काठावले बाळाराम ठाकूर लक्ष्मण



लबडे व गावातील महिला व कार्यकर्ते यांनी मेहनत घेवून जास्तीत जास्त मतदान कसे होईल या दृष्टीकोणातुन मेहनत घेतली त्या बद्दल या विजयात तुमचा सिंहाचा वाटा आहे हा विजय माझा नसून सर्व कार्यकर्त्यांचा विजय आहे असे उमेदवार सौ कमला एकनाथ देशेकर यांनी सर्वांचे आभार मानले

# धाकटा खांदा गावात वाघेश्वर मूर्तीचे भक्तीमय वातावरणात जल्लोषात स्वागत

**दैनिक युवक आधार**

**मच्छिंद्र पाटील/पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यातील धाकटा खांदा गावातील स्वयंभू गणपती मंदिरामध्ये वाघेश्वराच्या मूर्तीचे टाळ-मृदुंगाच्या गजरात मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. श्री क्षेत्र पंढरपूर येथे घडविण्यात आलेली वाघेश्वराची मूर्ती सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी धाकटा खांदा गावात आगमन पावली.

वाघेश्वराची मूर्ती गावात येणार असल्याची माहिती मिळताच सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने गावाच्या वेशीवर एकत्र जमले होते. तेथून टाळ-मृदुंगाच्या गजरात, भक्तीगीतांच्या तालावर वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक गावाच्या प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करत स्वयंभू गणपती



मंदिरापर्यंत नेण्यात आली.

मिरवणुकीदरम्यान टाळ-मृदुंगाच्या तालावर सर्व ग्रामस्थांनी एकच ठेका धरत भक्तीभावाने सहभाग घेतला. महिला वर्ग मोठ्या उत्साहात नृत्य करत होता, तर लहान मुले आनंदाने नाचत मिरवणुकीत सहभागी झाली होती. तरुण वर्गानेही मोठ्या जोशात टाळ-मृदुंगाच्या तालावर नृत्य करत उत्साह वाढवला.

या संपूर्ण सोहळ्यामुळे धाकटा खांदा गावात भक्ती, आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

# सत्यमेव जयते वॉटर कप निवासी तीन दिवसीय प्रशिक्षणासाठी वाशिम तालुका टीम रवाना



**दैनिक युवक आधार**

**गजानन पवार पाटील/वाशिम :** सत्यमेव जयते वॉटर कप निवासी 3 दिवसीय प्रशिक्षणा करिता 30 पुरुष 20 महिला एकूण 50 प्रशिक्षणार्थी KVK दुर्गापुर बडनेरा(अमरावती) येथे प्रशिक्षणासाठी रवाना.

यावेळी फित कापून हिरवी झेंडी दाखवून शुभेच्छा देताना श्री. संतोष वाळके उपविभागीय कृषी अधिकारी वाशिम,श्री.अतुल जावळे तालुका कृषी अधिकारी वाशिम, कु.रोहिणी उगले मॅडम, श्री.विठ्ठल गोरे,शिवाजी जाधव मंडळ कृषी अधिकारी वाशिम, सहाय्यक कृषी अधिकारी श्री.अनिल जैताडे साहेब व एम.डी. सोळंके व उपस्थित प्रशिक्षणार्थी.

# पाटोद्यात शिवजन्मोत्सवाचा भव्य सोहळा, तीन दिवस सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांची राहाणार रेलचेल..

## शिवजन्मोत्सव सोहळयास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे अध्यक्ष संतोष दादा जाधव यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती उत्सव-२०२६ निमित्त पाटोदा शहरात सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा अतिशय उत्साहात व दिमाखात साजरा करण्यात येणार आहे. शिवरायांचे विचार, शौर्य, स्वराज्याची प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान विविध सांस्कृतिक, सामाजिक व समाजोपयोगी कार्यक्रमांची मालिका राबविण्यात येणार आहे. १६ व १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ठिक-०६ ते ०९ या वेळेत अपेक्स मंगल कार्यालय, पाटोदा येथे भव्य सांस्कृतिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमधून पोवाडे, लोककला, शिवकालीन इतिहास व महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचे दर्शन नागरिकांना घडणार आहे. तर १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ठिक - ०९ ते ०२ या वेळेत डॉ.राजपुरे हॉस्पिटल, नगर पंचायत समोर, पाटोदा येथे नामांकित डॉक्टरांच्या उपस्थितीत मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी सायंकाळी ठिक- ०७ ते ०९ या वेळेत महिलांसाठी खेळ पैठणीचा होम मिनिस्टर हा कार्यक्रम होणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी शिव जयंतीच्या मुख्य दिवशी सकाळी ठिक- १०:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटोदा येथे शिव पुजन करण्यात येणार आहे. त्या नंतर नगर पंचायत हद्दीतील इयत्ता ०९ वी १० वी च्या निराधार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे. सकाळी ठिक - ११:०० वाजता रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली असून त्या नंतर भव्य शोभायात्रा मिरवणूक शहरातून काढण्यात येणार आहे. या शोभायात्रा मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य दिव्य अश्वारूढ पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज हत्ती अंबारी (वाघोली,



पुणे), जय ब्रह्मा बँजो (धुळे), जगदंबा संबळ पथक (बामदळवाडा, पाटोदा), ढोलीबाजा पथक (भीमनगर,पाटोदा), अघोरी पथक (हरियाणा), डमरू पथक (उज्जैन), हलगी पथक ( कुर्ला ), तलवार बाजी पथक, ढोलबाजी पथक (पाथर्डी), शिवकालीन आरमार, पाटोदा शहरातील सर्व शाळांचे लेझीम पथक तसेच घोडेस्वार व घोडे/उंट पथक सहभागी होणार असून संपूर्ण शहर शिवमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. शिवजन्मोत्सव हा केवळ उत्सव नसून तो विचारांचा जागर आहे. पाटोदा तालुका व शहरातील सर्व शिवप्रेमींनी भगवे फेटे परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा शिवजन्मोत्सव सोहळा यशस्वी करावा,”असे आवाहन सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष संतोष दादा जाधव यांनी केले आहे.

# रेवदंडा जिल्हा परिषद गटात शिवसेना (शिंदे गट)चा दणदणीत विजय; डॉ. सचिन राऊळ १०,२२३ मतांच्या विक्रमी फरकाने निवडून आले

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील सर्वात प्रतिष्ठित आणि हाय-व्होल्टेज ठरलेल्या रेवदंडा जिल्हा परिषद मतदारसंघात शिवसेना (शिंदे गट)ने बाजी मारली आहे. पक्षाचे नवखे पण निष्ठावान उमेदवार डॉ. सचिन शरद राऊळ यांनी १०,२२३ मतांच्या भगव्या फरकाने दणदणीत विजय मिळवला. प्रबळ प्रतिस्पर्धी मानले जाणाऱ्या शिवसेनेच्या (उबाटा गट) रायगड जिल्हा प्रमुख आणि माजी विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे यांचा त्यांनी पराभव केला. रेवदंडा-चौल-नागाव मतदारसंघातील जनतेने विकासाला प्राधान्य देत या निवडणुकीत आपला कौल दिला.प्रतिष्ठेची लढत नवख्या उमेदवाराने जिंकली.रेवदंडा जिल्हा परिषद गटाची ही निवडणूक केवळ तीन उमेदवारांमधील स्पर्धा नव्हती, तर ती खरीखुरी प्रतिष्ठेची आणि राजकीय लढत बनली होती. डॉ. सचिन राऊळ हे प्रथमच निवडणूक लढवत होते, तरी त्यांचा प्रदीर्घ समाजकार्याचा अनुभव आणि जनतेशी असलेला घट्ट जनसंपर्क हा विजयाचा निर्णायक ठरला. स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांचे कायमस्वरूपी मार्गदर्शन आणि साथ यामुळे संपूर्ण पॅनलने यश मिळवले. आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांत शिवसेना (शिंदे गट)ला पूर्ण यश लाभले.



पंचायत समितीतील विजयही जबरदस्त रेवदंडा गटासोबत पंचायत समितीच्या निवडणुकांमध्येही शिवसेनेने कमाल केली. रेवदंडा नागाव पंचायत समितीचे उमेदवार शरद गोंधळी हे ३,८२७ मतांच्या फरकाने विजयी झाले, तर वरंडे-चौल पंचायत समितीची उमेदवार अंकिता अंकुश घरत या ३,३०० मतांच्या मोठ्या फरकाने निवडून आल्या. या तिन्ही विजयांनी रेवदंडा-वरंडे-नागाव परिसरात शिवसेनेचा भगवा फडकला असून, जनतेच्या विश्वासाला बळकटी मिळाली आहे.

**"कार्यकर्त्यांचा जयघोष; "**

परिसर दुमदुमून गेला विजयानंतर रेवदंडा परिसरात शिवसैनिक कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. भूषण घरत, सरपंच प्रफुल्ल मोरे, योगेश पिटनाईक, तनुजा घरत, भारती मोरे यांसारख्या प्रचंड शिवसैनिकांनी आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी 'जय भगवा, जय महाराष्ट्र' असा दणक्यात जयघोष करत परिसर दुमदुमून गेला. विजयी उमेदवार आणि पॅनल सदस्यांचे फेटे घालून मिरवणुका काढण्यात आल्या

जनतेच्या मागण्या: विकासाच्या प्रत्यक्ष कृती अपेक्षित विकासाच्या मुद्द्यावर मतदान करणाऱ्या ग्रामस्थांनी विविध मागण्या मांडल्या आहेत. रेवदंडा-वरंडे-नागाव भागात कायमस्वरूपी पाणीपुरवठा, दर्जेदार रस्ते, स्थिर वीजपुरवठा आणि पर्यटन विकासाच्या योजना तातडीने राबवण्याची मागणी आहे. बाजारपेठेतील वाहतूक कोंडी, रेवदंडा परप्रांतीय हातगाडीवाल्यांमुळे उद्भवणारी रस्त्यावरील अडचणी दूर करणे, तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. "जनतेने मतदानाचे कर्तव्य पार पाडले, आता उमेदवारांनी विश्वासघात करू नये," अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये जोरदार होत आहे.डॉ. सचिन राऊळ म्हणाले, "जनतेच्या प्रेमाला मी वचनबद्ध आहे. या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करू." विजयानंतर ग्रामस्थांनी आनंद साजरा केला असून, विकासाच्या दिशेने नव्या आशा निर्माण झाल्या आहेत.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदे अधिक कडक व प्रभावी करावेत – उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी :** महिलांवरील अत्याचार, छळ आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे अधिक प्रभावी आणि काटेकोरपणे अंमलात आणणे आवश्यक आहे, असे विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागाचे संरक्षण अधिकारी आणि पोलीस विभागाच्या भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांची एकत्रित जिल्हा व तालुका तर शहरात झोन निहाय समन्वय बैठका घेण्यात याव्यात अशी स्पष्ट सूचना त्यांनी दिली.

विधानभवनात आयोजित या उच्चस्तरीय बैठकीत कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अधिक परिणामकारक करण्याबाबत, शक्ती विधेयकाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील दिशा ठरविण्याबाबत तसेच अर्नेश कुमार विरुद्ध बिहार राज्य या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयातील



सुधारणा याचिकेवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बीएनएस प्रमाणे कार्यप्रणालीत ३५ अ ते आय या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी पोलीसांनी केल्यास पिडीतांना दिलासा मिळेल म्हणुन पोलीसांनी योग्य ती कार्यप्रणाली तयार करावी अशाही सुचना ऊपसभापती नीलम गोर्हे यांनी दिल्या . पुढील एका महिन्यात या सर्व बाबतीत पाठपुरावा करून संबंधित विभागांनी तपशील ठरवावा असेही सुचवण्यात आले. या बैठकीचा अहवाल मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मा.ना. एकनाथजी शिंदे, मा.ना. सुनेत्राताई पवार यांचेकडे पाठविण्यात येंणार असल्याचे नीलमताई गोर्हेंनी नमुद केले.

या बैठकीस पोलीस महासंचालक सदानंद दाते, अपर पोलीस अधीक्षक अश्वती दोरजे, माजी न्यायमूर्ती साधना जाधव, महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे, उपसचिव डॉ. जयंत सरोदे, विधी व न्याय विभागाचे उपसचिव सागर बोन्द्रे, गृह विभागाचे अवर सचिव जयसेन इंगोले उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे यांनी बैठकीदरम्यान नमूद केले की, महिलांचा आत्मसन्मान, सन्मान आणि सुरक्षितता यासाठी राज्य यंत्रणांनी समन्वयाने आणि संवेदनशीलतेने काम करण्याची गरज आहे. कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये महिलांचा बळी जाणार नाही, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी आणि काटेकोरपणे राबविणे आवश्यक आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, महिलांना तातडीने न्याय मिळण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा अधिक सजग आणि संवेदनशील बनविणे अत्यावश्यक आहे. पोलीस विभाग आणि महिला व बाल विकास विभागाने संयुक्तरित्या कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी जिल्हास्तरावर करावी. जिल्हास्तरीय महिला दक्षता समित्यांच्या कार्याचा नियमित आढावा घेऊन त्यांच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात.

पीडित महिलांना तातडीने संरक्षण आदेश मिळवून देणे, पोटगी मिळविण्याच्या प्रक्रियेत होणारा विलंब टाळणे, तसेच महिलांना कायदेशीर सल्ला मिळण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी समन्वय वाढवणे या बाबींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच ज्येष्ठ सेवा तक्रार प्राधिकरणाबाबत अभ्यास करून अहवाल सादर करावा, अशी सूचनाही डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी दिली. त्याचबरोबर, अर्नेश कुमार विरुद्ध बिहार राज्य प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयात सुधारणा याचिका दाखल करण्याबाबत कायदेशीर चाचपणी सुरू असून त्यावर चर्चा बैठकीत झाली.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शेवटी सांगितले की, महिलांवरील अत्याचार हा समाजाच्या मनोवृत्तीशी निगडित गंभीर प्रश्न आहे. त्यामुळे फक्त कायदे कठोर करणे पुरेसे नाही, तर त्यांची अंमलबजावणी ही पारदर्शक, संवेदनशील आणि परिणामकारक असावी. महिलांचे सक्षमीकरण, न्यायप्राप्ती आणि सुरक्षिततेसाठी शासनाने एकत्रित प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

## समाजभूषण नासिकेत पानसरे यांना 'आदर्श पत्रकार पुरस्कार' प्रदान; दैनिक 'संध्या'च्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त गौरव

**दैनिक युवक आधार**

**पुणे / प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांना दैनिक 'संध्या'तर्फे आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील अग्रगण्य दैनिक 'संध्या'च्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. त्यामध्ये यंदाचा आदर्श पत्रकार पुरस्कार नासिकेत पानसरे यांना प्रदान करण्यात आला.

हा सन्मान दैनिक 'संध्या'च्या संपादिका सौ. ज्योती नाळे आणि पुणे महापालिकेचे नगरसेवक दादासाहेब कोद्रे यांच्या शुभहस्ते, नीतू मांडके सभागृह, पुणे येथे रविवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या समारंभात प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे मनपाचे नगरसेवक प्रशांत जगताप, भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे हे सध्या विक्रोळी कन्नमवार नगर येथील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाचे सचिव म्हणून कार्यरत आहेत. याआधी १९९३ साली माजी मंत्री अण्णासाहेब झुटे प्रतिष्ठानचा युवा पत्रकारिता पुरस्कार, तत्कालीन केंद्रीय मंत्री व मुंबई विभागीय काँग्रेसचे अध्यक्ष कै. मुरली देवरा यांच्या हस्ते त्यांना प्रदान करण्यात आला होता.

महाविद्यालयीन जीवनात असतानाच त्यांनी स्त्रीमुक्ती संघटना, हुंडाविरोधी चळवळ, दारूबंदी प्रचार मोहिम यांसारख्या सामाजिक चळवळींत सक्रिय सहभाग घेतला होता. त्यांच्या या समाजभानातून केलेल्या कार्याची दखल घेत विविध संस्थांनी त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे.

तसेच आर्थर रोड नाका येथील नवसाला पावणाऱ्या पानसरे-शिंदे उत्सव मंडळ (रजि.) यांच्या नवरात्रोत्सवाचे ते माजी मानद सचिव असून, सध्या ते सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या सामाजिक, पत्रकारितेतील आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सर्वत्र कौतुक व्यक्त करण्यात येत आहे.



# स्व. मनोहरभाईंचे व्यक्तिमत्व असामान्य – डॉ राहुल भगत

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये भारतनिर्मित 'मायक्लिप'द्वारे उच्च-जोखमीच्या हृदयरुग्णावर शस्त्रक्रियेविना यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल येथे पहिल्यांदाच मायक्लिप ही अत्याधुनिक हृदय उपचार प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आली. या उपचारामुळे अत्यंत धोकादायक स्थितीत असलेल्या एका हृदय रुग्णाचे प्राण वाचले आणि ओपन-हार्ट शस्त्रक्रिया टाळणे शक्य झाले.

एका ५५ वर्षीय रुग्णाला काही दिवसांपासूनच छातीत वेदना होणे आणि श्वास घेण्यास त्रास जाणवू लागला होता. तपासणीत त्यांच्या हृदयाच्या झडपेत (मिट्रल वाल्व) मोठ्या प्रमाणात गुंतागुंत असल्याचे आढळले. तसेच हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता खूपच कमी झाली होती. याआधी २०१९ मध्ये त्यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया झाली झाल्याने पुन्हा ओपन-हार्ट सर्जरी करणे अतिशय धोकादायक होते.





या गंभीर परिस्थितीत मेडिकव्हर हॉस्पिटलच्या हृदयतज्ज्ञांच्या टीमने शस्त्रक्रियेऐवजी कॅथेटरद्वारे उपचार करण्याचा निर्णय घेतला. प्रथम हृदयाला रक्तपुरवठा सुरळीत करण्यासाठी अँजिओप्लास्टी करण्यात आली. त्यानंतर मायक्लिप प्रक्रियेच्या मदतीने हृदयाची झडप बंद करण्यात आली. यासाठी दोन मायक्लिप्स बसवण्यात आल्या.

ही प्रक्रिया सुमारे दोन तासांत पूर्ण झाली. उपचारानंतर रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली. एका महिन्याच्या तपासणीत हृदयाची कार्यक्षमता २५ टक्क्यांवरून ४५ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे आढळून आले. कोणतीही गुंतागुंत न होता रुग्णाला दुसऱ्याच दिवशी घरी सोडण्यात आले.

ही प्रक्रिया करणारे वरिष्ठ इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. अनुप महाजनी म्हणाले की,* अशा उच्च-जोखमीच्या रुग्णांसाठी मायक्लिपसारखे उपचार वरदान ठरत आहेत. या प्रकरणात वेळीच उपचार मिळाल्यामुळे रुग्णाचे प्राण वाचविणे शक्य झाले.

आपली भावना व्यक्त करताना रुग्ण म्हणाले, पुन्हा ओपन-हार्ट शस्त्रक्रियेची कल्पना करुनच मी घाबरुन गेलो होतो. मात्र डॉक्टरांनी प्रसंगावधान राखत शस्त्रक्रियेविना सुरक्षित उपचार केले आणि मला नवे आयुष्य मिळवून दिले *त्यामुळे मी डॉक्टरांच्या टीमचे मनापासून आभार मानतो*

नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्र प्रमुख संदीप जोशी म्हणाले, ही प्रक्रिया नवी मुंबईत अत्याधुनिक आणि जागतिक स्तरावर मान्यता मिळालेल्या हृदयविकार उपचारांमधील तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे उत्तम उदाहरण ठरते. मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची टीम, आधुनिक उपचार पध्दती आणि रुग्णांकरिता आवश्यक सर्व सुविधा यांच्या माध्यमातून रुग्णांना सर्वोत्तम व रुग्ण-केंद्रित सेवा देण्यावर भर दिला जातो. उच्च जोखमीच्या हृदय रुग्णांनाही सुरक्षित उपचार, लवकर बरे होण्याची संधी तसेच निरोगी भविष्याची भेट देणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

# स्व. मनोहरभाईंचे व्यक्तिमत्व असामान्य – डॉ राहुल भगत

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी /अमृतलाल चरडे/तुमसर :** 'गोंदिया शिक्षण संस्थेचे संस्थापक तथा पूर्व विदर्भातील जनसामान्यांचे नेते स्वर्गीय श्री मनोहरभाई पटेल म्हणजे असामान्य व्यक्तिमत्त्वाचे धनी होते' असे प्रतिपादन एस एन मोर महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य राहुल भगत यांनी केले.

गोंदिया शिक्षण संस्थेद्वारा संचलित सेठ नरसिंगदास मोर कला, वाणिज्य व श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालयात नुकताच स्वर्गीय श्री मनोहरभाई पटेल जयंती समारोह आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ राहुल भगत हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रा डॉ जयंतकुमार मस्के, डॉ जगन्नाथ गडपायले व डॉ हितेश कल्याणी हे उपस्थित होते.

आपल्या भाषणात डॉ राहुल भगत पुढे म्हणाले की, 'गुजरात मध्ये एका सामान्य कुटुंबामध्ये जन्मलेल्या



मनोहरभाईंनी महाराष्ट्रातील पूर्व विदर्भात येऊन काळाच्या पटलावर आपली नाममुद्रा उमटवली.

या परिसरातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीचे ते शिलेदार ठरले. १९५८ साली गोंदिया शिक्षण संस्थेची स्थापना करून सर्वसामान्यांसाठी शिक्षणाचे द्वार खुले केले. त्यामुळे सर्वांनीच मनोहर भाईप्रती कृतज्ञ असायला हवे.'

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ रेणुकादास उबाळे म्हणाले की, 'ज्या काळामध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते, त्या काळात शिक्षणाच्या सर्वत्रिकीकरणाचे प्रयत्न मनोहर भाईंनी केले.

पूर्व विदर्भाच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे विदर्भातील हरितक्रांतीचे जनक म्हणून त्यांची ऐतिहासिक कामगिरी आहे. त्यामुळे स्वर्गीय श्री मनोहर भाई पटेल हे महनीय व्यक्ती ठरतात.'

याप्रसंगी डॉ जयंत कुमार मस्के म्हणाले की, 'मनोहरभाईंनी गोंदिया शहरासोबतच पूर्व विदर्भाचा चेहरा-मोहरा बदलून टाकला. त्यामुळेच ते लोकप्रिय नेते ठरले.'

डॉ जगन्नाथ गडपायले म्हणाले की, 'त्या काळात मनोहरभाईंची कीर्ती केवळ विदर्भापूर्तीच नव्हती. तर संपूर्ण महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणावर त्यांचा प्रभाव होता.' यावेळी डॉ हितेश कल्याणी यांनी स्व. श्री मनोहरभाई पटेल यांच्या विचार कार्यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ रेणुकादास उबाळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ सचिन वेरुळकर यांनी केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेचे स्वयंसेवक तसेच मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# माणगाव पंचायत समितीवर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा

## जिल्हा परिषदेच्या ४ जागांपैकी प्रत्येकी २ जागा शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसकडे

**दैनिक युवक आधार**

**सचिन पवार माणगाव :** संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष वेधून राहिलेल्या माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या ४ जागांपैकी प्रत्येकी २ जिल्हा परिषद गटांवर शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार निवडून आले असून माणगाव पंचायत समितीवर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकला आहे. माणगाव येथील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेसचे खा. सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे व शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांनी प्रतिष्ठेची केली होती. यामध्ये शिवसेना पक्षाने जोरदार मुसंडी मारली.

जिल्हा परिषदेच्या २ जागा व पंचायत समितीच्या ५ जागांवर शिवसेनेचे उमेदवार निवडून आल्यावर माणगाव तहसील कार्यालय येथील मैदानात शिवसैनिकांनी घोषणाबाजी व गुलालाची उधळण करीत जयघोष केला. तर राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणारा मोर्बा जिल्हा परिषद गट व मोर्बा पंचायत समिती गणातून तसेच तळाशेत जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गण व साई पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले असून राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष केला.



माणगाव तहसील कार्यालय याठिकाणी निवडणुकीचे निर्णय अधिकारी तथा माणगावचे प्रांताधिकारी डॉ. संदीपान सानप यांच्या अधिपत्याखाली सोमवार दि. ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडली. या मतमोजणीवेळी तहसील कार्यालय माणगाव याठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे व माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. माणगाव तालुक्यात ४५ निजामपूर, ४६ तळाशेत, ४७ मोर्बा, ४८ गोरेगाव हे चार जिल्हा परिषद गट येत असून या चार जागांसाठी एकूण १७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. तर ८९ पाटणूस, ९० निजामपूर, ९१ तळाशेत, ९२ साई, ९३ वडवली, ९४ मोर्बा, ९५ गोरेगाव, ९६ लोणेरे या आठ पंचायत समिती जागांसाठी एकूण २६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

विजयी जिल्हा परिषद उमेदवार यादी पुढीलप्रमाणे:

•४५ निजामपूर जिल्हा परिषद गट – अविनाश अनिल नलावडे – शिवसेना

•४६ तळाशेत जिल्हा परिषद गट – दिशा दिपक जाधव – राष्ट्रवादी काँग्रेस

•४७ मोर्बा जिल्हा परिषद गट – अस्लम इब्राहीम राऊत – राष्ट्रवादी काँग्रेस

•४८ गोरेगाव जिल्हा परिषद गट – दिनेश जनार्दन हरवंडकर – शिवसेना

विजयी पंचायत समिती गण उमेदवार:

•८९ पाटणूस – विलास यशवंत शिंदे – शिवसेना

•९० निजामपूर – अक्षय कृष्णा जाधव – शिवसेना

•९१ तळाशेत – मनोरसा संदेश मालोरे – राष्ट्रवादी काँग्रेस

•९२ साई – संगिता संजय बक्कम – राष्ट्रवादी काँग्रेस

•९३ वडवली – पदरत ज्ञानदेव मारुती – शिवसेना

•९४ मोर्बा – अल्का सुभाष केकाणे – राष्ट्रवादी काँग्रेस

•९५ गोरेगाव – स्वाती अरुण करकरे – शिवसेना

•९६ लोणेरे – रवींद्र महादेव टेंबे – शिवसेना

# कराटे बेल्ट टेस्ट २०२६ उत्साहात संपन्न

## किंग मार्शल आर्ट्स अकॅडमी अँड स्पोर्ट्सचा यशस्वी उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** खांदा कॉलनी येथील आग्री शिक्षण संस्था, सेक्टर ६, खांदा कॉलनी येथे किंग मार्शल आर्ट्स अकॅडमी अँड स्पोर्ट्स यांच्या वतीने दिनांक ८ फेब्रुवारी रोजी कराटे बेल्ट टेस्ट २०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला विद्यार्थ्यांबरोबरच पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमात एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, तर सुमारे २०० पालकांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी पाहुण्यांसमोर कराटे प्रात्यक्षिके (डेमॉन्स्ट्रेशन) सादर करत आपली शिस्त, आत्मविश्वास व कौशल्य यांचे प्रभावी दर्शन घडवले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून मा. श्रीमती स्मिता ढाकणे (वरिष्ठ पोलीस




निरीक्षक खांदेश्वर पोलीस स्टेशन) तसेच डॉ. श्रुती जाधव (प्राचार्य, गोखले एज्युकेशन सोसायटी लॉ कॉलेज, खारघर) उपस्थित होत्या. तसेच मराठी अभिनेत्री कु. समृद्धी म्हात्रे आणि रायगड सम्राट न्यूजचे संपादक श्री. शंकर वायदंडे यांनी विशेष उपस्थिती लावली.

या कार्यक्रमाचे मुख्य प्रशिक्षक (Chief Instructor – Raigad) म्हणून श्री. संजय गमरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुढील प्रशिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले:

- •कु. प्रतीक्षा शेरकर
- •श्री. श्रेयस गमरे
- •श्री. यश वारके
- •श्री. हर्षद चंदनशिवे
- •कु. श्रुती बोने
- •कु. काजल मंडल

कार्यक्रमाचे आयोजन किंग मार्शल आर्ट्स अकॅडमी अँड स्पोर्ट्सचे अध्यक्ष श्री. स्वप्नील वारंगे (NIS) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत, कराटेमुळे शिस्त, आत्मसंरक्षण व आत्मविश्वास वाढतो, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# बिबी येथे संत गजानन महाराजांचा प्रकट दिन सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/बीबी:** येथे श्री संत गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त गजानन महाराज सांस्कृतिक आश्रम बहुउद्देशीय संस्था येथे ६ फेब्रुवारी पासुन उत्साहास सुरुवात झाला. ८ फेब्रुवारीला महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली,बीबी येथे सालाबादप्रमाणे याहीवर्षी संत गजानन महाराज प्रगट दिन सोहळा गुरुवर्य संत हभप रंगनाथ बाबा यांच्या आशीर्वादाने व ग्रामस्थांच्या सहकार्याने साजरा करण्यात आला. यानिमित्त दररोज नामवंताचे प्रवचन, कीर्तन, भारुड, राष्ट्रीय एकात्मता, व्यसनमुक्ती जनजागृती, देश वाचवा लेक वाचवा' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी संत गजानन महाराज मंदिरात होमहवनयज्ञ मूर्ती अभिषेक करण्यात आला

**प्रकटदिनानिमित्त कीर्तन**

काकडा भजन, हरिपाठ, गजानन विजय ग्रंथाचे पारायण साठी ९१ महिला व पुरुष यांनी सहभाग घेतला होता , व गजानन महाराज चरित्र व सायंकाळी नामवंत महाराजांचे हरिकीर्तन होत . ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता गजानन महाराजांच्या प्रतिमेची रथातून नगरप्रदक्षिणा वारकऱ्यांच्या टाळ मृदंगाच्या गजरात काढण्यात आले व नगरप्रदक्षिणेमध्ये माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे साहेब नगरप्रदक्षणेत वारकऱ्यांसोबत भजन व फुगडी खेळून आनंद घेतला नगर प्रदक्षिणेमध्ये हजारो वारकऱ्यांच्या संख्येने नगर प्रदक्षिणा काढण्यात आली. यावेळी रथ पालखीचे पूजन ठाणेदार चंद्रकांत पाटील साहेब व अभयदादा चव्हाण सभापती राजु इंगळे बबन बनकर चंद्रकला गुलमोहर संदीप चव्हाण बबलू आटोळे सागर बनकर शाहीर चव्हाण शकुआप्पा बनकर राजु मुंढे



दिलीप फडके यांनी केले.व नंतर काल्याचे कीर्तन सारंगधर महाराज टेके यांनी केले. त्यानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. यावेळी भाविक भक्त, महिला, पुरुष, बाळ गोपाळ यांनी हजारोच्या संख्येने महाप्रसादाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थान विश्वस्त सारंगधर महाराज टेके रमेश कुरंगळ गोविंद टेके गोपाल महाराज टेके वैभव आंधळे गोटु आवगळे रमेश उबाळे समाधान नरवडे व समस्त गावकरी मंडळी बिबी व परिसरातील भाविक भक्तांच्या सहकार्याने संपन्न झाले

# पत्रकार दत्ता खंदारे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी ) :** समाजरत्न पुरस्कार हा विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रदान करण्यात येणारा एक प्रतिष्ठित सन्मान आहे. असाच एक पुरस्कार पत्रकारिता क्षेत्रात गेल्या ३० वर्षांपासून कार्यरत असणारे पाक्षिक धारावी वार्ता १५वर्ष यशस्वीरित्या चालवून जनतेच्या समस्या सोडविणारे,साप्ताहिक भगवे वादळचे संपादक,उत्कृष्ट पत्रलेखक, स्तंभलेखक श्री दत्ता खंदारे यांना सृष्टी संस्थां प्रायोजित "आम्ही वडाळा पूर्वकर"च्या८ व्या वर्धापनदिनी ८फेब्रुवारी २०२६ रोजी मान्यवर व्यक्तीच्या हस्ते "समाजरत्न" पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.पुरस्कार सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून दत्ताराम दळवी( माजी अध्यक्ष मुंबई वृत्तपत्र लेखक संघ),भाऊ सावंत,( अध्यक्ष हुतात्मा स्मारक कमिटी),असुंता



डिसोझा( सामाजिक कार्यकर्त्या),हेमलता सदाशिवम( सामाजिक कार्यकर्त्या),युसूफ दरबार,( जेष्ठ संगीतकार ब्यांजो वादक),सुधाकर काश्यप्य ( जेष्ठ पत्रकार),आनंद प्रभू ( जेष्ठ मनसे नेते)सुनील शिंदे ( जेष्ठ पत्रकार),भगवान भुसारा ( मुख्याध्यापक ) सुफियान वनू( माजी नगरसेवक ) उपस्थित होते.

# सिंदपुरी रुयाळ येथे केंद्रीय संविधान रक्षक संघटनेतर्फे वर्धापन दिनानिमित्त त्याग मूर्ती रमाई जयंती,भोजनदान , पाणीवाटप, प्रबोधन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** पवनी तालुक्यातील सिंदपुरी रुयाळ येथे दिनांक 8 फेब्रुवारी 2026 ला सिंदपुरी रुयाळ येथे वर्धापन दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संघटना व महिला अधिकार सामाजिक संघटनेतर्फे त्या त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती,प्रबोधन कार्यक्रम , भोजनदान , पाणी वाटप, केंद्रीय संविधान रक्षक चे प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, सन्मान प्रमाणपत्र, नियुक्तीपत्र सदर कार्यक्रमात वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन सदानंद धारगावे केंद्रीय संविधान रक्षक संस्थापक/सचिव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राध्यापक भाविक सुखदेवे ब्रह्मपुरी होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटन प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे




राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांचे हस्ते करण्यात आले .यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भिक्खू संघ,नम्रता बागडे अध्यक्षा महाराष्ट्र राज्य महिला अधिकार सामाजिक संघटना, लक्ष्मण दुबे, जीवन बोधी बौद्ध,,वैशालीताई टेंभुरकर, भीमरावजी वैद्य, तागडे, पांडुरंग नंदागवळी, लक्ष्मण दुबे, आस्तिक नंदागवळी, , कविता सुखदेवे, स्वामींनी मेश्राम, हर्षा मेश्राम , सारिका नागदेवे महासचिव महाराष्ट्र राज्य, शोभना सरोजकर विदर्भ अध्यक्षा, वैशाली वालदे विदर्भ महासचिव ,वैशाली रामटेके भंडारा जिल्हाध्यक्ष, सीमा काळे भंडारा जिल्हा कार्याध्यक्ष उपस्थित होते .

कार्यक्रम यशस्वी करण्याकरता अस्मिता नगराळे नागपूर जिल्हा अध्यक्षा,भावना शेंडे , स्नेहल मेश्राम ,भारती कांबळे ,पूजा पाटील ,ज्योती रामटेके, पोर्णिमा वैद्य, भीमराव वैद्य, घरडे सर, आस्तिक नंदा गवळी, कविता सुखदेवे ,स्वामिनी मेश्राम ,हर्षा मेश्राम, संघमित्रा चव्हाण, अर्पणा जांगडे, दिपाली गजभिये ,बिंदूताई रामटेके ,आशिष मेश्राम, पांडुरंग नंदागवळी, हेमंत मेंदवाडे, पचारे सरपंच मॅडम, व डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक संघटना , महाराष्ट्र राज्य महिला अधिकार सामाजिक संघटना ,विदर्भवादी शेतकरी संघटना ,व केंद्रीय संविधान रक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

# परीक्षेला सामोरे जाताना भाग :२

इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनो आपण यापूर्वीच्या माझ्या लेखामध्ये परीक्षेला सामोरे जाताना याविषयी व अभ्यासाबद्दल वाचले आहे. पण बाळांनो आपण शारीरिक तंदुरुस्त असाल तरच परीक्षा निर्विघ्नपणे पार पडेल. यासाठी आपला आहार अतिशय महत्त्वाचा आहे. मला बत्तीस वर्ष शहरातील शाळेचा व पाच वर्ष ग्रामीण भागातील शाळेचा अनुभव आहे. शहरातील अनेक मुलांना बाहेरील खाणे आवडते, पण बाळांनो कटाक्षाणे लक्षात ठेवा, मी गेली अनेक वर्ष विद्यार्थ्यांना सांगत आलो आहे की घरात आईने जे जेवण बनवलेले आहे ना तोच चौरस आहार असतो. आपला आहार कसा असावा आणि आपल्या आहारामध्ये जीवनसत्व आणि खनिजांचे महत्त्व किती आहे हे आपण विज्ञानामध्ये वाचतो आणि त्याच ठिकाणी सोडून देतो. पण अनुभव असा आहे की आपली आई किंवा आज्जी सुशिक्षित असो किंवा अशिक्षित असो त्या जो आहार देतील तोच अतिशय योग्य आहार असतो. पण आपल्या जिभेला बाहेरची चव लागलेली असते आणि ते शरीराला आणि आरोग्याला अतिशय हानिकारक आहे. बाळांनो लक्षात ठेवा, आता परीक्षा तोंडावर आली आहे, आपण खूप अभ्यास केला



आहे, आणि ऐनवेळी आजारी पडला तर वर्षभर केलेला अभ्यास फुकट जाईल. कळतंय ना? म्हणून आता कटाक्षाणे लक्षात ठेवा, घरचाच आहार घ्या, सर्व भाज्या व फळे आहारात असू द्या, भूक जेवढी असेल त्या पेक्षा दोन घास कमी खा आणि खुप जागरण अजिबात करू नका. भुकेल्या पोटाणे तर अजिबात अभ्यास करू नका. हळूहळू अशक्तपणा येऊन रोगप्रतिकारक शक्ती कमी होईल म्हणून सर्व संतुलन ठेवा, संतुलित आहार घ्या संतुलित अभ्यास करा आणि आनंदात परीक्षा पूर्ण करा सगळेच आनंदी राहतील. आपल्या अभ्यासाचा कोणालाही त्रास होणार नाही याचीही काळजी घ्या. पालकांनाही विनंती आहे की आपल्या बाळाचा अभ्यास उत्तमच होईल असे वातावरण घरात ठेवावे .

आणि शेवटी पालकांना आपल्या मुलांचा अभ्यास घेण्यासाठी आणि मुलांना परीक्षेसाठी खूप खूप शुभेच्छा.

कोणाला काही शंका असेल तर संपर्क करू शकता .माझा संपर्क क्रमांक- 92 20 54 58 0 2.

श्री जे.के. कुंभार सर (बी. एससी. एम. एड. डी. एस. एम. ,माजी पर्यवेक्षक के. आ.बांठिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल.

## आशा स्वयंसेविका संजीवनी पाटील'समाजरत्न पुरस्काराने, सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**बदलापूर प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकर :** समाजाचे आपण काही देणे लागतो,या उक्तीप्रमाणे आपण काही सामाजिक कार्य करावे आणि समाजात सामाजिक दृष्ट्या जनजागृती करावी म्हणून गेली कीत्येक वर्षे कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या आशा स्वयंसेविका संजीवनी धोंडीराम पाटील या कार्यरत आहेत.आरोग्य विभागात सर्वोत्कृष्ट काम करत असताना त्यांना विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. संजीवनी पाटील यांच्या सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक कार्याची दखल मुंबई येथील आम्ही वडाळा पूर्वकर या




संस्थेने घेतली.त्यांच्या या कार्यकर्तृत्वाचा गौरव म्हणून वडाळा येथे संपन्न झालेल्या पुरस्कार सोहळयात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संजीवनी पाटील यांना'समाजरत्न पुरस्काराने, सन्मानित करण्यात आले.त्यांना या प्राप्त झालेल्या पुरस्कारामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.